MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष विसावे/अंक ४/एप्रिल २०१९

## संपादकीय

### नॉत्र-दामच्या निमित्ताने



दि.१५ एप्रिल रोजी फ्रान्सच्या 'नॉत्र दाम' या जगप्रसिद्ध चर्चला आग लागली व संपूर्ण जगाचे लक्ष त्याकडे वेधले गेले. आगीचे कारण अजूनही स्पष्ट झाले नाही. या ऐतिहासिक वास्तूचा इतिहास व फ्रान्सच्या सांस्कृतिक अवकाशातील तिचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. नॉत्र दाम हे केवळ चर्च वा कथिड्रल नसून जवळ जवळ दीड हजार वर्षांचा फ्रान्सचा इतिहास सांगणारा एक युगपुरुष आहे. या चर्चचा 'ओक' वृक्षाच्या लाकडापासून बनवलेल्या छताचा कळसाचा भाग जळून खाक झाला. मात्र दगडी वास्तू अजून तशीच आहे. त्यात असलेल्या अनेक वारसा ठराव्या अशा वस्तूंना आगीची झळ बसली नाही असे सकृद्दर्शनी दिसते. आग का लागली याची कारणमीमांसा होईलच; पण 'नॉत्र दाम'ची पुनर्बांधणी करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची मदत अवघ्या काही तासांत जाहीर केली गेली. ही मदत जाहीर करणाऱ्यांत फ्रान्समधील अनेक उद्योगपती आहेत. एखाद्या वास्तूला देशाच्या अंतःकरणाच्या गाभाऱ्यात स्थान असल्याचा हा दुर्मीळ पुरावा.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

या निमित्ताने नॉत्र दामचा इतिहास पाहणे मोठे उद्‌बोधक ठरेल.

प्रतिवर्षी १३ दशलक्ष लोक भेट देत असलेल्या 'नॉत्र दाम' या चर्चचे पूर्ण नाव 'नॉत्र दाम द पारी' (Our Lady of Paris) असे आहे. व्हर्जिन मेरी ही येथील मुख्य देवता. फ्रान्स मधील 'लूव्र' (Louvre) वस्तुसंग्रहालय व Institute de France ही महत्त्वाची सांस्कृतिक संस्था या नॉत्रदामच्या जवळपास आहेत. या फ्रेंच संस्कृतीच्या इतिहासातील अग्रगण्य असलेल्या संस्था. 'नॉत्र दाम' चे बांधकाम इ.स. ११६० साली 'बिशप मॉरीस द सली' याच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. मध्ययुगीन कॅथोलिक ख्रिश्चन धर्माचे एक धर्मपीठ म्हणून हे चर्च अस्तित्वात आले. फ्रेंच गोथिक शिल्पशास्त्र (French Gothic Architecture) चा उत्कृष्ट नमुना म्हणजे नॉत्रदाम. या चर्चचे बांधकाम जवळ जवळ १०० वर्षे चालले व इ.स.१२६० मध्ये पूर्ण झाले. इतिहासातील महत्त्वाच्या घडामोडी, युद्धे व राज्यक्रांतींच्या या वास्तूवर देखील परिणाम होत होता. इतिहासात प्रसिद्ध असलेल्या (Hundred Years War) शंभर वर्षाचे युद्ध या फ्रान्स व इंग्लंड मधील भीषण युद्धाची मूक साक्षीदार राहिलेली वास्तू म्हणजे नॉत्र दाम. इ.स.१४३१ साली इंग्लंडचा राजा ६ वा हेन्रीच्या राज्याभिषेकाचा उत्सव 'नॉत्र दाम' मध्येच झाला.

शंभर वर्षांच्या युद्धात इंग्रज प्रत्येक वेळेला फ्रेंचांवर मात करीत होते. फ्रान्सच्या मनात इंग्रजांप्रती असलेल्या द्वेषाचे हे मूळ कारण आहे. जोन ऑफ आर्क (Joan of Arc) नावानी विश्वप्रसिद्ध झालेल्या फ्रेंच रणरागिणीचा पुतळा देखील 'नॉत्र दाम' मध्ये लावण्यात आला. वयाच्या १२ व्या वर्षी या मुलीने फ्रेंचाच्या पराभवाचा वचपा काढण्यासाठी हातात तलवार घेतली व धर्मसत्तेच्या सहाय्याने इंग्रजांना वठणीवर आणलं. १४३१ साली जोनचा 'बर्गंडी' परगण्यात इंग्रजांकडून अनन्वित छळ करवून जाळून मारण्यात आले. फ्रेंच अस्मितेचा ज्वलंत पुतळा म्हणून 'नॉत्र दाम' येथील जोनचा पुतळा पाहण्यात येतो. पुढे प्रख्यात नाटककार जॉर्ज बर्नड शॉ यांनी देखील 'जोन ऑफ अर्क' नावाचे नाटक लिहून तिला अजरामर केले आहे.




**जोन ऑफ आर्क**

१५ व्या शतकाच्या सुरुवातीला प्रबोधन युगाच्या (Renaissance) काळखंडात नॉत्र दामच्या स्थापत्य शैलीत बदल करण्यात आला. नॉत्र दामच्या आधारभूत अशा उंच खांबांना फुलांनी कोरलेल्या चित्रजवनिका (Tapestry) लावण्यात आल्या. या सुंदर फुलांच्या चित्रांनी सजवलेल्या विशालकाय खिडक्या 'नॉत्र दामच्या' सौंदर्यात भर टाकतात.

(पृष्ठ क्र.३९ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा




## वर्ष विसावे/अंक ४/एप्रिल २०१९



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक १० वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. प्रशांत पु. धर्माधिकारी | |
| २) | मोदी कालखंडातील भारताचे परराष्ट्र व संरक्षण धोरण : उपलब्धी विपुल, आव्हाने बाकी | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | ३ |
| ३) | अर्थसंकल्प : वेगळे काहीतरी (उत्तरार्ध) | श्री. चन्द्रशेखर टिळक | ११ |
| ४) | प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था | श्री. मधुकर गजानन दातार | १५ |
| ५) | सण आणि आरोग्य गुढीपाडवा, गौरी तीज, रामनवमी, हनुमान जयंती | डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी | १६ |
| ६) | आनंदाचा मागोवा | गौरी अंबाजी परब | १९ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २४ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# मोदी कालखंडातील भारताचे परराष्ट्र व संरक्षण धोरण : उपलब्धी विपुल, आव्हाने बाकी

*मोदी सरकारच्या भारतीय परराष्ट्र व संरक्षण धोरणावर प्रकाश टाकणारा डॉ. शैलेंद्र देवळणकर यांचा अभ्यासपूर्ण लेख - संपादक*

भारतीय परराष्ट्र आणि संरक्षण धोरणात अभिनव प्रयोग आणणाऱ्या मोदी डॉक्ट्रीनला पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रात कोणत्याही कृतीचे परिणाम दिसण्यासाठी मोठा कालावधी जावा लागतो. भारताच्या स्वातंत्र्यापासून भारतातील पंतप्रधान व परराष्ट्र मंत्र्यांनी परराष्ट्र धोरणाला नवीन दिशा देण्याचा वेळोवेळी प्रयत्न केलेला आहे. तथापि, २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळामध्ये परराष्ट्र व संरक्षण धोरण हे सर्वाधिक चर्चेचा विषय बनले. पंतप्रधान मोदींचे पाच वर्षांतील ७० हून अधिक परदेश दौरे, चीनबरोबरचा डोकलामचा वाद, पाकिस्तानविरुद्ध सर्जिकल व प्रिएम्प्टिव्ह ॲटॅक, मुस्लिम राष्ट्रांबरोबर संबंध सुधारण्यापासून ते अंतराळातील उपग्रह पाडण्याची क्षमता विकसित करण्यापर्यंत मोठ्या घडामोडी या पाच वर्षांच्या काळात घडल्या. अलीकडेच सीआरपीएफच्या जवानांवर झालेल्या पुलवामा हल्ल्यानंतर ज्यापद्धतीने संपूर्ण आंतरराष्ट्रीय समुदाय भारताच्या पाठीशी उभा राहिला, संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेने आपल्या इतिहासात पहिल्यांदाच या हल्ल्यावर टीका करणारा प्रस्ताव मंजूर केला, या हल्ल्यानंतर भारताने केलेल्या सर्जिकल स्ट्राईकच्या विरोधात चकार शब्दही कोणी काढला नाही यावरून भारताच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय प्रभावाची पावती मिळते. त्याचप्रमाणे शांघाय सहकार्य संघटना, एमटीसीआर, वासेनर व ऑस्ट्रेलिया समूह यांसारख्या प्रभावशाली आंतरराष्ट्रीय संघटनांचे सदस्यत्व मिळण्याबरोबरच अमेरिकेकडून प्राप्त झालेला STA-1 दर्जा व रशियाकडून प्राप्त झालेली एस ४०० ही क्षेपणास्त्र विरोधी यंत्रणा हे भारताचे मोठे यश मानले पाहिजे. G-20 सारख्या संघटनांच्या व्यासपीठांवरून भारताने उपस्थित केलेला व मान्य झालेला काळ्या पैशाचा प्रश्न या सारख्या उपलब्धी एकीकडे असताना दुसरीकडे मात्र अद्यापही चीनचा खोडसाळपणा, पाकिस्तानच्या कुरघोड्या यांसारखी आव्हाने बाकी आहेत. परंतु एकूणच परराष्ट्र धोरणाला कमालीचे महत्त्व देणारा हा कालखंड ठरला आहे.



या पाच वर्षांच्या कार्यकाळातील विविध क्षेत्रातील कामगिरीविषयी जनमताचा कानोसा घेणाऱ्या काही पाहण्या सध्या समोर आल्या आहेत. यातील एका महत्त्वाच्या पाहणीमध्ये मोदी सरकारने सर्वाधिक चांगली कामगिरी परराष्ट्र धोरणामध्ये केली असल्याचे मत जनतेने नोंदवले आहे. यानिमित्ताने मोदी काळातील परराष्ट्र धोरणाचा विस्तृतपणानं आढावा घेणारा आणि आगामी काळातील आव्हानांचा वेध घेणारा हा संशोधनपर लेख.

आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये सध्या १९३ देश आहेत. हे सर्व देश म्हणजे सार्वभौम केंद्रे (सॉव्हरीन ॲक्टर्स) आहेत. प्रत्येक जण आपापले राष्ट्रीय हितसंबंध साधण्यासाठी प्रयत्न करत असतो. त्यासाठी परराष्ट्र धोरण आणि राज-अनुनयाचा वापर केला जातो. आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्याला हव्या त्या गोष्टी मिळत नसतात. ज्या गोष्टी प्राप्त करायच्या असतात त्यासाठी प्रामुख्याने सौदेबाजी आणि संघर्ष अटळ असतो. त्या सहजगत्या प्राप्त होत नाहीत. परराष्ट्र संबंध आणि राज-अनुनय यामध्ये देवाण-घेवाण (ट्रँझॅक्शन्स) होत असते. परराष्ट्र धोरणाचा वापर प्रामुख्याने दुसऱ्यावर कसा प्रभाव पाडता येईल, आपल्या सभोवतालचे मत आपल्याला अनुकूल कसे करता येईल, आपल्या सभोवतालची परिस्थिती आपले राष्ट्रीय हितसंबंध साधण्यासाठी कशी उपयुक्त, पोषक करता येईल, त्याचप्रमाणे आपला प्रभाव इतरांवर कसा पडू शकेल, इतर राष्ट्रे त्यांचे मत आपल्याला अनुसरून कसे बदलतील यासाठी केला जातो. त्या माध्यमातून राष्ट्रे आपापले हितसंबंध साधण्याचा प्रयत्न करतात.

**परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून राष्ट्रीय सत्ता वाढवणे**

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये प्रचंड गतिमानता असते आणि त्यामध्ये अनिश्चितताही असते. परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून प्रत्येक राष्ट्र आपली राष्ट्रीय सत्ता (नॅशनल पॉवर) वाढवण्याचा प्रयत्न करत असते. राष्ट्रीय सत्ता मोजण्याची दोन परिमाणे आहेत.

१) इतर राष्ट्रांवर दबाव टाकून त्यांचे मत आपल्या बाजूने, आपल्या मर्जीप्रमाणे वळवू शकतो इतकी आपली क्षमता आहे का हा घटक महत्त्वाचा असतो.

२) इतर राष्ट्रांनी आपल्यावर टाकलेला दबाव थोपवण्याची ताकद आपल्यामध्ये आहे का हेही महत्त्वाचे असते.

या दोन परिमाणांच्या आधारे राष्ट्रीय सत्तेचे मोजमाप करता येऊ शकते. यासाठी परराष्ट्र धोरण आणि राज-अनुनयाचा वापर केला जातो. अशा स्वरूपाने राष्ट्रीय सत्ता वाढवण्यासाठी राष्ट्रे आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी करत असतात. तसेच परराष्ट्र धोरणातील अल्पकालीन व दीर्घकालीन उद्दिष्टे निर्धारित करत असतात. प्रत्येक राष्ट्रांचा प्रयत्न हा इतर राष्ट्रांवर प्रभाव टाकून त्यांना आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांच्या अनुषंगाने वागण्यास प्रवृत्त करण्याचा असतो. भारतदेखील याला अपवाद नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या परराष्ट्र धोरणाचे मूल्यमापन या आधारावर करावे लागेल. २०१४ मध्ये स्पष्ट बहुमत घेऊन मोदींच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेत आले आणि या स्पष्ट बहुमताचा परिणाम निश्चितपणे परराष्ट्र धोरणावर झालेला आहे. मोदी सरकारच्या गेल्या पाच वर्षांतील कामगिरीचे मूल्यांकन करताना असे लक्षात येते की, परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रात या सरकारने सर्वांत भरीव कामगिरी केलेली आहे. तुलनात्मक दृष्ट्या इतिहासात डोकावून पाहता ही कामगिरी ऐतिहासिक स्वरूपाची म्हणावी लागेल.

**परराष्ट्र धोरणाला प्राधान्य**

गेल्या पाच वर्षातील परराष्ट्र विषयक घडामोडींवर नजर टाकताना एक गोष्ट सर्वांत प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे केंद्रातील सरकारने परराष्ट्र धोरणाला दिलेले सर्वाधिक प्राधान्य. कारकीर्दीच्या पाच वर्षांमध्ये परराष्ट्र धोरणाला इतके महत्त्व देणारे आणि जवळपास ५०हून अधिक देशांना भेटी देणारे नरेंद्र मोदी हे स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासातील पहिले पंतप्रधान आहेत. मनमोहनसिंग यांनीही ४५ देशांना भेटी दिल्या होत्या; पण त्या त्यांच्या पूर्ण १० वर्षांच्या कारकीर्दीमध्ये घडल्या होत्या. मोदी सरकारने परराष्ट्र धोरणाला प्राधान्य देत

त्याचा विकास अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने करण्याचे धोरण अवलंबले आहे. परराष्ट्र धोरणाकडे भारताचे आर्थिक हितसंबंध साधण्याचे साधन म्हणून पाहिले जाऊ लागले. त्यामुळेच आपल्याकडे सध्या परराष्ट्र धोरणाची जितकी चर्चा होताना दिसत आहे, तितकी ती यापूर्वी कधी झाल्याचे दिसून आले नाही. आज भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे बदलताना दिसत आहेत. भारताच्या अंतर्गत विकासासाठी आणि प्रामुख्याने आर्थिक विकासासाठी परराष्ट्र धोरणाचा वापर कसा करता येईल या दृष्टीने परराष्ट्र धोरणाकडे पाहिले जात आहे. आर्थिक हितसंबंध साधण्याचे साधन म्हणजे परराष्ट्र धोरण हा दृष्टिकोन विकसित झालेला आज पाहायला मिळत आहे.

**परराष्ट्र धोरणाला प्राधान्य का?**

२०१४च्या लोकसभा निवडणुकांच्या प्रचारादरम्यान नरेंद्र मोदींनी जवळपास ४५० भाषणे दिली होती. त्यांच्या संपूर्ण निवडणूक प्रचार मोहिमेमध्ये आर्थिक विकास आणि त्यातून रोजगारनिर्मिती यावर भर देण्यात आला होता. त्यादृष्टिकोनातून परराष्ट्र धोरणाची आखणी केली जावी यावर त्यांनी भर दिला होता. याला पार्श्वभूमी होती ती त्यांच्या गुजरातमधील मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीची. नरेंद्र मोदी हे गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी पुढाकार घेऊन अनेक देशांचे दौरे केलेले होते आणि त्यातून त्यांनी मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक गुजरातमध्ये आकर्षित केलेली होती. एकट्या चीनला त्यांनी जवळपास तीन वेळा भेट दिलेली होती. याशिवाय जपान आणि इतर दक्षिण पूर्व आशियायी देशांच्या भेटीवर ते जाऊन आलेले होते. या सर्व दौऱ्यांमधून त्यांनी या देशांनी आपला आर्थिक विकास कसा साधला याचा अभ्यास केला होता, निरीक्षण केले होते. खास करून चीनच्या आर्थिक विकासाच्या आणि प्रगतीच्या मॉडेलने त्यांना प्रभावित केले होते. तसेच दक्षिण पूर्व आशियायी देशांनी आर्थिक प्रगती कशी साधली आणि त्यांनी एशियन टायगर म्हणून कसा नावलौकिक मिळवला, दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेल्या जपानसारख्या देशाने १९७० च्या दशकात जगातील दुसरी अर्थव्यवस्था बनण्यापर्यंत कशी भरारी घेतली, यासंदर्भातील बऱ्याच गोष्टींचा अभ्यास त्यांनी केलेला होता. त्यामुळे निवडणूक निकालांनंतर जेव्हा एनडीएचे शासन प्रस्थापित झाले आणि पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली तेव्हा मोदींनी भारताच्या आर्थिक विकासासाठी काही महत्त्वाकांक्षी प्रकल्प आखले. हे प्रकल्प जसे 'मेक इन इंडिया', डिजिटल इंडिया, स्किल इंडिया, स्टार्ट अप इंडिया, स्वच्छ भारत अभियान, स्टँडअप इंडिया अशा स्वरूपाचे होते आणि या प्रकल्पांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी आपली आर्थिक धोरणे आणि परराष्ट्रनीती आखली. मेक इन इंडियाच्या माध्यमातून देशातील उत्पादनक्षेत्राचा आणि उद्योगधंद्यांचा विकास करणे, त्यातून आर्थिक विकास दर वाढवणे आणि मुख्य म्हणजे रोजगाराला चालना देणे अशा प्रकारचे उद्दिष्ट तयार करून त्यानुसार त्यांनी आखणी केली. त्यानुसार या सरकारचे पूर्ण परराष्ट्र धोरण हे उपरोक्त प्रकल्पांभोवतीच प्रामुख्याने फिरताना दिसते आहे. या परराष्ट्र धोरणाचा गाभा हा भारताचा आर्थिक विकास हा आहे.

या परराष्ट्र धोरणामध्ये अनेक नवीन प्रवाह दिसून येतात. या प्रवाहांचा ऊहापोह करणे औचित्याचे आहे.

**परराष्ट्र धोरणातील नवे प्रवाह**

• **आर्थिक हितसंबंधांच्या पूर्ततेचे ध्येय :**

शीतयुद्धाच्या काळामध्ये भारताचे परराष्ट्र धोरण हे तत्कालीन परिस्थितीनुसार राजकीय उद्दिष्टांनी प्रेरित होते. त्यामुळे परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून भारतामध्ये परकीय गुंतवणूक आणणे, इतर देशांच्या बाजारपेठा भारतासाठी मिळवणे, इतर देशांबरोबर आर्थिक भागीदारी विकसित करणे, भारताच्या आर्थिक विकासासाठी

आवश्यक असणाऱ्या इतर गोष्टी मिळवणे या दृष्टिकोनातून फारसा विचार झालेला नव्हता. त्याकाळी भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये राजकीय मुद्द्यांना फार महत्त्व दिले गेलेले होते. शीतयुद्धोत्तर काळामध्ये म्हणजे विशेषतः पी. व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असताना व मनमोहनसिंग वित्तमंत्री असताना परराष्ट्र धोरणांच्या उद्दिष्टांमध्ये बदल होण्याची प्रक्रिया सुरू झाली. पण आज आर्थिक उद्दिष्टे केंद्रस्थानी मानून आणि भारताच्या औद्योगिक विकासावर भर देणाऱ्या मेक इन इंडियावर भर देऊन या सरकारने परराष्ट्र धोरणाची आखणी केली आहे. २०१४ ते २०१९ पाच वर्षांच्या कार्यकाळामध्ये भारतात साधारणपणे ५०० अब्ज डॉलर्स इतकी परकीय गुंतवणूक आणण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवलेले आहे. त्यासाठीच पंतप्रधान स्वतः हे आर्थिक दृष्ट्या प्रगत असणाऱ्या देशांना भेटी देत आहेत आणि त्या राष्ट्रांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी आवाहन करत आहेत. त्या देशांचे भांडवल आणि तंत्रज्ञान हे भारताच्या आर्थिक विकासासाठी कसे उपयोगी ठरू शकते, यासाठी या सरकारचे प्रयत्न सुरू आहेत.

- **परराष्ट्र धोरणाच्या लोकशाहीकरणाचा प्रयत्न** :

आतापर्यंत भारताच्या परराष्ट्र धौरणाचे क्षेत्र हे परराष्ट्र मंत्रालय आणि तेथील नोकरशहा यांच्यापुरते मर्यादित राहिलेले होते. परराष्ट्र धोरण म्हणजे केवळ दोन देशांच्या राष्ट्रप्रमुखांमधील भेटी-चर्चा किंवा राजनैतिक पातळीवरील संबंध, त्यांच्यामधील क्रिया-प्रतिक्रिया अशीच ओळख होती. परराष्ट्र धोरणाला दिल्लीच्या बाहेर घेऊन येणे फार गरजेचे होते. परराष्ट्र धोरणामध्ये सामान्य माणसांच्या आर्थिक आकांक्षा, अपेक्षा यांचे प्रतिबिंब पडणे किंवा परराष्ट्र धोरणाने त्यांचे प्रतिनिधित्त्व करणे आवश्यक होते. याचे कारण हा केंद्राचा विषय असला तरी भारतामध्ये संघराज्य व्यवस्था असल्यामुळे राज्यांबरोबर त्या संदर्भात संवाद साधला जाणे गरजेचे होते. त्यादृष्टीने या सरकारने सहकार्यात्मक आणि स्पर्धात्मक संघराज्य ही संकल्पना पुढे आणली. त्यामुळेच परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी प्रत्येक राज्य हे सक्रिय झाल्याचे, पुढे आल्याचे गेल्या तीन वर्षांत दिसून आले. त्यासाठी बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश अशा राज्यांमध्ये प्रवासी भारतीयांची संमेलने आयोजित केली गेली. त्याचप्रमाणे राज्यांचे मुख्यमंत्री हे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी देशाबाहेर जाऊ लागले. अलीकडेच चीन, मंगोलिया, दक्षिण कोरिया या तीन देशांच्या दौऱ्यावर पंतप्रधानांसोबत गुजरातच्या मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सहभाग असल्याचे दिसून आले. अशा प्रकारे परदेश दौऱ्यावर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना घेऊन जाणे आणि तेथे त्यांना परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी संधी देणे हा प्रकार अभिनव असून तो पहिल्यांदाच पाहायला मिळाला. त्यामुळे नवी दिल्लीच्या परिक्षेत्रामधून परराष्ट्र धोरणाला बाहेर काढणे आणि ते सर्वाधिक सर्वसमावेशक बनवणे, त्यामध्ये सर्वसामान्यांच्या आकांक्षांचे प्रतिबिंब पडण्यासाठी प्रयत्न करणे या परराष्ट्र धोरणाच्या लोकशाहीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या गोष्टी गेल्या वर्षभरात आपल्याला पाहायला मिळाल्या. देशाचे परराष्ट्र धोरण ठरवताना ते राष्ट्रीय हितसंबंधांवरच असायला हवे. तथापि हे धोरण निर्धारित करताना घटक राज्यांबरोबरदेखील चर्चा व्हायला हवी या दृष्टिकोनातून पहिल्यांदाच भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयात एका सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. हा अधिकारी परराष्ट्र धोरण निर्णयनिर्मिती प्रक्रियेत राज्यांच्या सूचनांचे संकलन करेल.

- **सांस्कृतिक प्रवाह** :

भारताने आजवर सांस्कृतिक दृष्टिकोनातून परराष्ट्र धोरणाचा फारसा विचार केलेला नव्हता. तो विचार या सरकारच्या काळामध्ये मुख्यत्वे करून सुरू झाला. या पाच वर्षांच्या काळामध्ये नरेंद्र मोदी सरकारने बुद्धिस्ट

आणि इस्लामिक देशांबरोबर सांस्कृतिक राज-अनुनयाच्या माध्यमातून संबंध विकसित करून भारताचे आर्थिक हितसंबंध साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. बुद्ध धर्माचा उगम आणि विकास भारतामध्ये झाला; परंतु आज बुद्धिस्ट देशांचे नेतृत्त्व हे प्रामुख्याने चीनकडे आहे. वर्ल्ड बुद्धिस्ट फेलोशिपला आर्थिक साहाय्यही चीनकडूनच दिले जात आहे. परंतु पहिल्यांदाच या चीनच्या वर्चस्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न भारताकडून केला जात असल्याचे अनेक घटनांवरून दिसून आले आहे. नियोजनपूर्वक बुद्धिस्ट देशांना भेटीसाठी निवडणे, बुद्धिस्ट धर्मस्थळांना भेटी देणे, त्यांच्या धर्मगुरुंसोबत चर्चा करणे, त्या धर्मगुरुंना भारतात बोलावणे, भारतामध्ये त्यांच्या विशेष बैठकांचे आयोजन करणे या सर्वांमधून बुद्धिस्ट राष्ट्रांमध्ये भारताबाबतचा एक सकारात्मक संदेश जात आहे. थोडक्यात, आपल्या सांस्कृतिक अंगाचा वापर करून आर्थिक विकास साधण्याचा आणि विविध देशांशी संबंध विकसित करण्याचा प्रयत्न या सरकारने केलेला दिसत आहे. त्याचप्रमाणे पश्चिमेकडील इस्लामिक देशांबरोबरदेखील भारताने सांस्कृतिक राज-अनुनयाच्या माध्यमातून संबंध घनिष्ट करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. ज्या-ज्यावेळी मोदींनी आशियातील इस्लामिक देशांचे दौरे केले त्या त्यावेळी तेथील धार्मिक स्थळांना भेटी दिल्या.

**• लोकराज-अनुनयाचा प्रवाह :**

परराष्ट्र धोरण हे दोन देशांमधील राजकीय प्रमुखांमधील संभाषणे, चर्चा-परिषदा एवढ्यापुरते मर्यादित न ठेवता त्याला एक नवा आयाम देण्याचा प्रयत्न या सरकारने केला आहे. त्यानुसार राजकीय पातळीवरील संबंधांखेरीज या देशातील लोकांचे त्या देशातील लोकांशी (पीपल टू पीपल), उद्योगपतींचे उद्योगपतींशी संबंध प्रस्थापित करणे, त्यांच्यामध्ये चर्चा घडवून आणणे या माध्यमातून लोकराज-अनुनयाचा अतिशय उत्तम वापर नरेंद्र मोदी यांनी आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये करण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी जगभरातील देशांमध्ये असणाऱ्या भारतीयांना त्यांनी साद घालण्यास सुरुवात केली आहे. आज जवळपास अडीच कोटी भारतीय हे सुमारे १०० हून अधिक देशांमध्ये स्थायिक झालेले आहेत. या भारतीयांचे आर्थिक विकासामध्ये मोठे योगदान राहिले आहे. हे भारतीय प्रतिवर्षी साधारणतः ७० अब्ज डॉलर्स इतका प्रचंड पैसा भारतात पाठवतात, ज्याला आपण फॉरेन रेमिटन्स असे म्हणतो. हा पैसा अनेकदा आपल्याला आर्थिक संकटाच्या काळामध्ये कामी येतो. हा पैसा बॉण्डसच्या रूपाने आपल्याकडे उपलब्ध असतो. काही वर्षांपूर्वी संपूर्ण आशिया खंडामध्ये आर्थिक मंदी आली होती (जो एशियन करन्सी क्रायसिस म्हणून ओळखला जातो.) त्यावेळी अनिवासी भारतीयांच्या या पैशाचा आपल्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळाला होता. आताही संपूर्ण युरोपमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक मंदी आहे आणि अशा परिस्थितीत अनिवासी भारतीयांकडून येणारा पैसा आपल्यासाठी महत्त्वाचा ठरत आहे. त्यामुळे या लोकांकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली. आपल्या परदेश दौऱ्यादरम्यान तेथील भारतीयांचे संमेलन भरवणे, त्यांना एकत्र आणणे आणि त्यांना भावनिक साद घालून भारतामध्ये गुंतवणुकीसाठी आवाहन करणे याला पंतप्रधानांनी प्राधान्य दिल्याचे दिसते. पंतप्रधानांच्या या आवाहनाला जबरदस्त प्रतिसादही मिळाल्याचे दिसून आले.

**• परराष्ट्र धोरणातील लक्ष्मणरेषा (रेडलाईन्स)**

भारताने परराष्ट्र धोरणातील आपली काही उद्दिष्टे आणि हितसंबंध निर्धारित केले असून कोणत्याही परिस्थितीमध्ये या हितसंबंधांना धक्का लागणार नाही यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे. विविध देशांचे दौरे करताना आणि विविध देशांशी संबंध विकसित करत असताना कोणत्याही परिस्थितीमध्ये भारताचे परराष्ट्र धोरणातील निर्णयस्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी आणि

भारताचे जे गाभ्याचे हितसंबंध (कोअर इंटरेस्ट) आहेत त्यांना धक्का न लागण्यासाठी या सरकारने काही लक्ष्मणरेषा (रेड लाईन्स) आखल्या आहेत. उदाहरणच द्यायचे तर, विश्व व्यापार संघटनेबरोबरच्या ट्रेड फॅसिलिटेशन अॅग्रीमेंट संदर्भात भारताने अतिशय कडक स्वरूपाचे धोरण स्वीकारत नकाराधिकाराचाही वापर केला. अलीकडेच भारताने अमेरिकेच्या आर्थिक निर्बंधांच्या धमकीची पर्वाही न करता भारतीय सुरक्षेसाठी आवश्यक असणारी एस-४०० ही अँटी बॅलेस्टीक मिसाईल सिस्टीम रशियाकडून विकत घेण्याचा करार केला. त्याचप्रकारे अमेरिकेने चार नोव्हेंबरची मुदत दिलेली असतानाही भारताने इराणकडून तेल आयात करण्याचा निर्णय कायम ठेवला व शेवटी अमेरिकेकडून सवलतही मिळवली. याचाच अर्थ असा होतो की, भारताचे परराष्ट्र धोरण वॉशिंग्टन अथवा क्रेमलिनमध्ये ठरत नाही तर ते भारतातच ठरते. तशाच प्रकारची कडक भूमिका त्यांनी पाकिस्तानबाबत घेतलेली दिसते. काश्मीरचा प्रश्न हा केवळ भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील असून तिसऱ्या पक्षाला यामध्ये हस्तक्षेप करू दिला जाणार नाही अशी स्पष्ट भूमिका घेत आपली लक्ष्मणरेषा दाखवून दिली. असाच प्रकार चीनबाबतही दिसून येतो. चीनशी आर्थिक हितसंबंध विकसित करण्यासाठी प्रयत्न करत असतानाच या सरकारने भारत-चीन सीमेवर साधनसंपत्तीचा विकास करण्यास सुरुवात केली आहे. थोडक्यात, 'कॅरेट अँड स्टिक' म्हणजेच एकीकडे गाजरही दाखवायचे आणि दुसरीकडे हातात काठीही ठेवायची अशा स्वरूपाचे धोरण या सरकारने अवलंबल्याचे दिसते आहे. पाकिस्तानवरील दोन सर्जिकल स्ट्राईक याचे उत्तम उदाहरण आहे.

### दहशतवादाच्या प्रतिरोधनाचे नवे तंत्र

या कालखंडात भारताचा दहशतवाद प्रतिरोधनाचा एकूणच दृष्टिकोन बदलला आहे. सर्जिकल स्ट्राईक आणि Preemptive Attack प्रकारे दहशतवादाचे प्रतिरोधन आपण आजवर करत नव्हतो. याचा अर्थ, आपल्यावर भविष्यात होऊ शकणाऱ्या संभाव्य हल्ल्यांना गृहित धरून ते थोपवण्यासाठी अथवा नष्ट करण्यासाठी केलेला हल्ला. अशा प्रकारचे हल्ले अमेरिका, इस्राईलकडून केले जातात. भारताने ही पद्धती पहिल्यांदाच वापरली आहे. बालाकोटातील दहशतवादी तळामध्ये २५० प्रशिक्षित दहशतवादी होते. त्यांनी भविष्यात भारतात येऊन हिंसाचार घडवून आणलाच असता. त्यापूर्वीच आपण त्यांना कंठस्नान घातले.

- **डिफेन्सिव डिफेन्स कडून ऑफेन्सिव डिफेन्सकडे**

दुसरी गोष्ट म्हणजे आपण दहशतवादाबाबतचे आपले धोरण बदलले आहे. पूर्वी आपले धोरण डिफेन्सिव डिफेन्स असे होते. आता आपले धोरण 'ऑफेन्सिव डिफेन्स' आहे. याचाच अर्थ आपण आपल्या रक्षणार्थ हल्ला करणे. आजवर भारताने स्वतःवर एक बंधन घालून घेतले होते. त्यानुसार भारत कधीही पहिल्यांदा हल्ला करणार नाही. मात्र ताज्या कारवाईत भारताने प्रथम हल्ला केला आहे. त्यामुळे आपल्या आजवरच्या चौकटीला आपण छेद दिला आहे.

### नियोजनबद्ध परराष्ट्र धोरणाची आखणी

नरेंद्र मोदी यांच्या परदेशदौऱ्यांची आखणी ही अतिशय सूत्रबद्ध पद्धतीने करण्यात आल्याचे दिसून येते. साधारणतः पाच टप्प्यांमध्ये परराष्ट्र धोरणाची आखणी करण्यात आली आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात दक्षिण आशियातील शेजारील राष्ट्रांशी संबंध घनिष्ट करण्याचे ठरवले आहे. त्यामागे दोन उद्दिष्टे होती. एक म्हणजे शेजारील राष्ट्रांचा विश्वास संपादन करणे आणि दुसरे उद्दिष्ट गेल्या दहा वर्षांमध्ये वाढत चाललेला चीनचा दक्षिण आशियातील हस्तक्षेप कमी करणे. त्यानुसार भूतान, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका आणि मालदीव या देशांचे दौरे पंतप्रधानांनी केले. या दौऱ्यांमधून काही महत्त्वपूर्ण गोष्टी घडलेल्या आहेत. आज शेजारील

राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था डबघाईला आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना आर्थिक मदत करणे, त्यांच्या विकासाला मदत करणे याला प्राधान्य देण्यात आले. त्यानुसार नेपाळ आणि भूतानमध्ये जलविद्युतनिर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर मदत करण्यात आली. गेल्या पाच वर्षांतील एक मोठी उपलब्धी म्हणजे भारत आणि बांगला देश यांच्यामध्ये १९७४ पासून प्रलंबित असणारा भू-सीमारेषा करार पूर्णत्त्वास गेला. त्यामुळे दोन्ही देशांमधील भूखंडांच्या अदलाबदलीचा अतिशय कठीण आणि गुंतागुंतीचा प्रश्न सोडवला गेला. त्यामुळे बांगलादेशसोबतचे संबंध सुधारण्यास फार मोठी मदत झाली.

**परराष्ट्र धोरणावर पंतप्रधानांची पकड**

अलीकडच्या काळात परराष्ट्र धोरण हे प्रामुख्याने राष्ट्रप्रमुखांकडूनच निर्धारित केले जाते व ते अमलात आणण्यासाठी आवश्यक प्रयत्नही केले जातात. अमेरिका व इतर प्रगत युरोपियन देशांमध्ये परराष्ट्र मंत्र्यांऐवजी राष्ट्रप्रमुखच (पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष) परराष्ट्र धोरणाला दिशा देण्याचा प्रयत्न करतात. बहुराष्ट्रीय परिषदांमध्ये तसेच द्विपक्षीय करार करताना राष्ट्रप्रमुखच अग्रस्थानी असतात. असाच प्रकार आता भारतात दिसायला लागला आहे. नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर काही बदल प्रामुख्याने दिसून आले. त्यात पहिला होता परराष्ट्र धोरणाबाबत. पारंपरिकदृष्ट्या परराष्ट्र मंत्री परराष्ट्र धोरणाला वळण देत असत. मात्र पंतप्रधान जेव्हा प्रचंड शक्तिशाली असतात तेव्हा तेच परराष्ट्र धोरणाला वळण देऊ लागतात. पंडित नेहरू यांच्या काळात हे घडताना आपण पाहिले आहे.

पंतप्रधान मोदींनी परराष्ट्र धोरणामध्ये काही मूलभूत बदल घडवून आणले.

१. परराष्ट्र धोरणामध्ये गतिमानता, विविधता आणली.

२ परराष्ट्र धोरणाकडे व्यक्तीगत लक्ष दिले आणि त्यात ऊर्जा निर्माण केली.

३. परराष्ट्र धोरणात निश्चितता आणि ठामपणा आणला. पूर्वी अर्धवट राहिलेल्या गोष्टी, काही करार पूर्णत्वास नेले.

४. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारतामध्ये भव्य, उच्च स्वप्ने पाहण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण केली. आत्तापर्यंत भारताचे वर्णन हे 'रिलक्टंट सुपरपॉवर' म्हणून होत होते. मोठा देश असूनही कोणतेही कृत्य करायला तयार नसल्याने, पुढाकार घेत नसल्याने भारताला 'उदासीन सत्ताकेंद्र' म्हटले जायचे. भारत आजवर आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न करत होता. त्या भूमिकेऐवजी भारताने आता नेतृत्व प्रदान केले पाहिजे या परराष्ट्र धोरणातील उद्दिष्टाला खूप मोठी उंची मोदींच्या नेतृत्वाने गाठून दिली. पंडित नेहरूंच्या काळात आशिया खंडाचे नेतृत्व भारताने केले पाहिजे अशी नेहरूंची कल्पना होती. तशाच पद्धतीने जगात नेतृत्त्व करणारी सत्ता म्हणून पुढे येण्याची क्षमता भारतात आहे ही जाणीव मोदींच्या काळात निर्माण करण्यात आली. पूर्वी आपल्याकडे क्षमता असूनही आपण उच्च स्वप्ने पहात नव्हतो. आता ती परिस्थिती बदलली आहे. हे मोदींच्या परराष्ट्र धोरणाचे एक खूप महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

**मोदी कालखंडातील भारतीय परराष्ट्र धोरणाची मुख्य उद्दिष्टे**

विद्यमान शासनाने परराष्ट्र धोरणाची काही मुख्य उद्दिष्ट्ये निर्धारित केलेली होती.

१) समृद्धी : भारताच्या आर्थिक विकासासाठी परराष्ट्र धोरणाचा वापर करण्यात येत आहे. भारतामध्ये आर्थिक चढ-उतार होत असतानाही परकीय गुंतवणूक येत आहे आणि ती सातत्याने वाढत आहे. सन २००० मध्ये भारताला प्रतिवर्षी ०.५ अब्ज डॉलर्स इतकी परदेशी गुंतवणूक भारतात होत होती. २०१७ मध्ये हा आकडा ५.५ अब्ज डॉलर्सवर पोहोचला. २०१६-१७ मध्ये तर सर्वच देशांनी भारताला प्राधान्य दिल्याने भारताने चीनलाही मागे टाकल्याचे दिसून आले. आर्थिक

मानांकनांमध्ये भारताचे रेटिंग वाढते राहिले. मूडीज, जागतिक बँकेने, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताची प्रगती उत्तम सुरू असल्याचे सांगितले. इज ऑफ डूईंग बिझनेस' च्या क्रमवारीमध्येही भारताने लक्षणीय झेप घेतली आहे. २०१८ मध्ये प्रकाशित झालेल्या डुईंग बिझनेस विथ इज या अहवालामध्ये भारताची क्रमवारी २०१४ च्या १४२ क्रमांकावरून ७६ वर पोहोचली आहे. थोडक्यात, भारताने समृद्धीच्या दृष्टीने परराष्ट्र धोरण उत्तम पद्धतीने वापरण्यात आले.

२) सुरक्षा : या संदर्भात काही महत्त्वाच्या गोष्टी घडल्या आहेत. मागील काळात भारताला संरक्षण तंत्रज्ञान निर्यात करण्यावर अमेरिका किंवा प्रगत राष्ट्रांनी निर्बंध टाकले होते. मोदी शासनाच्या काळात ते निर्बंध काढून टाकण्यात आले. दुहेरी वापराचे संवेदनशील तंत्रज्ञान (सेन्सेटीव्ह ड्युएल युझ टेक्नॉलॉजी) अमेरिका, इस्राईल, जपान यांच्याकडून भारताला मिळते आहे. त्यामुळे संरक्षण क्षेत्रात महत्त्वाची प्रगती होते आहे आणि मोठ्या प्रमाणात अत्याधुनिक शस्त्रास्त्रे पाश्चिमात्य देशांकडून मिळू लागली आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने नागरी अणुकरार प्रत्यक्षात आला आहे. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे संरक्षण राज-अनुनय. त्या अंतर्गत भारत मोठमोठ्या देशांबरोबर संयुक्त लष्करी कवायती करू लागला. त्या माध्यमातून भारताने आपली शक्ती जगाला दाखवायला सुरुवात केली.

सुरक्षेच्या संदर्भात तीन महत्त्वपूर्ण निर्णय घेतले गेले. यातील पहिला निर्णय होता फ्रान्सकडून ३६ राफेल विमाने खरेदी करण्याचा. हा करार गेल्या एक दशकापासून प्रलंबित होता. दुसरा निर्णय म्हणजे रशियाकडून एस ४०० ही अँटीबॅलेस्टीक सिस्टीम रशियाकडून विकत घेण्याचा करार आणि तिसरी उपलब्धी म्हणजे भारतीय बनावटीची पहिली आण्विक पाणबुडी आयएनएस अरिहंत ही तयार करण्यात आली. हा प्रकल्प गेल्या ५० वर्षांपासून सुरू होता. तो या सरकारने पुढाकार घेऊन पूर्ण केला.

याखेरीज भारताने काही पारंपरिक सामरिक निर्बंध (स्ट्रॅटेजिक रिस्ट्रेन) टाकून घेतले होते. उदाहरणार्थ, पाकिस्तानकडे अणुबॉम्ब, क्षेपणास्त्र असल्याने आपण युद्ध अथवा प्रत्युत्तरादाखल कारवाई केल्यास पाकिस्तान अण्वस्त्रांचा मारा करेल, असा एक समज करून घेतला होता. याचा फायदा घेत पाकिस्तानचे दहशतवादी हल्ले भारत सहन करत होता. २००१ च्या संसदेवरील हल्ल्यापासून ते मुंबईवरील हल्ल्यापर्यंत हा आपल्याकडे मानसिक अडथळा होतो. मोदी शासनाने सर्जिकल स्ट्राईक करून त्यातून भारताला बाहेर काढले. आपण कसा प्रतिहल्ला करू शकतो हे त्यांनी जगाला दाखवून दिले.

याच काळात भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) आणि डीआरडीओ यांनी ऐतिहासिक पाऊल टाकत एक अत्यंत दमदार यश मिळवले आहे. ऑपरेशन शक्ती अंतर्गत भारताने पहिल्यांदा उपग्रहभेदी क्षेपणास्त्राच्या मदतीने अंतराळातील उपग्रह अंतराळातच उद्ध्वस्त करण्याची क्षमता प्राप्त केली आहे. या संदर्भात केलेल्या चाचणीमध्ये अवघ्या ३ मिनिटांमध्ये पृथ्वीपासून ३०० किलोमीटर दूर अंतरावर असणाऱ्या अवकाशातील एक उपग्रह उद्ध्वस्त करण्यात आला. अशा प्रकारची क्षमता आतापर्यंत केवळ रशिया, अमेरिका आणि चीन या तीनच राष्ट्रांकडे होती. आता भारताने या 'एलिट क्लब'मध्ये आपले नाव अभिमानाने नोंदवले आहे. या कामगिरीमध्ये सर्व भारतीय शास्त्रज्ञांचे हे महत्त्वाचे योगदान यात आहे. या यशामुळे भारताची संरक्षणसिद्धता तर वाढली आहेच; पण भारताची प्रतिरोधन क्षमताही वाढली आहे.

३) स्वाभिमान : पंतप्रधान मोदी यांनी भारताची मान जगात उंचवण्याचा प्रयत्न केला आणि त्यातून आज जगात भारताची उच्च प्रतिमा निर्माण झाली आहे. याचाच परिणाम आज परकीय थेट गुंतवणुकीचा ओघ सातत्याने भारतात येत असल्याचे पाहायला मिळते आहे. अर्थव्यवस्थेत काही चढउतार झाले तरीही

(पृष्ठ क्र.१४ वर)

# मध्यमवर्गीय अर्थसंकल्प

## (अर्थसंकल्प : वेगळे काहीतरी ....उत्तरार्ध)

*अंतरीम अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय? याविषयीची माहिती या लेखात दिली आहे- संपादक*

१ फेब्रुवारी २०१९ रोजी आपल्या संसदेत सादर झालेल्या अर्थसंकल्पात जसा तेल, सोने आणि अनुदान या शब्दांचा उल्लेख नाही; तसा त्या अर्थसंकल्पात अधिभार (सरचार्ज) या शब्दाचाही उल्लेख नाही. अधिभार या शब्दाचा उल्लेख नसण्याची दोन कारणे असू शकतात .... एकतर हा अंतरीम अर्थसंकल्प आहे आणि दुसरे म्हणजे त्यावेळी तात्पुरता का होईना पण त्यावेळी अर्थखात्याचा कारभार मा. अरुण जेटली यांच्याकडे नव्हता.

अधिभार या शब्दाचा उल्लेखही नसणे आणि तो नव्याने लागूही नसणे हे खरोखरच चांगले पाऊल आहे. मध्यमवर्गीय भारतीयांना तरी तसं नक्कीच वाटत असेल.

पण म्हणून या अर्थसंकल्पाला मध्यमवर्गीय भारतीयांचा अर्थसंकल्प म्हणण्याचे ते काही एकमेव कारण नाही.

या अर्थसंकल्पात वैयक्तिक आयकराबाबत ज्या काही महत्त्वाच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत त्याही यादृष्टीने अवश्य लक्षात घेण्याजोग्या आहेत. कारण त्या जितक्या मध्यमवर्गीय मंडळींसाठी महत्त्वाच्या आहेत; तितक्याच त्या आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राच्या प्राबल्याचे वस्तुस्थितीची जाणीव करून देणाऱ्या आहेत. खरं म्हणजे, मध्यमवर्गीय आणि सेवा क्षेत्राचे प्राबल्य मान्य करणारा असाच हा अर्थसंकल्प आहे. असा अर्थसंकल्प सादर करण्यात या अर्थसंकल्पाचे अन्तरीमत्त्व आड आले नाही हे कौतुकास्पदच आहे.

हे जर सविस्तरपणे पाहायचे असेल तर याच अर्थसंकल्पातल्या त्या तरतुदी पाहाणे उपयोगी ठरेल.

यांपैकी पहिली तरतूद म्हणजे या अर्थसंकल्पातली सगळ्यात जास्त चर्चा झाली अशी तरतूद जी पाच लाख रुपयांपर्यंतच्या उत्पनाबाबतचा आयकर.

या अर्थसंकल्पात पाच लाख रुपयांपर्यतच्या उत्पन्नात आयकर भरण्यात सवलत देण्यात आली आहे. पाच लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आलेले नाही. याबाबत अर्थमंत्र्यांनी 'रिबेट' असा शब्दप्रयोग केला आहे; एक्झेम्पशन असा नाही.

याबाबत झालेला गोंधळ अर्थसंकल्पात किंवा अर्थमंत्र्यांच्या मनात नाही.

एकतर तो गैरसमज तरी आहे किंवा मुद्दामहून घडवून आणलेला तरी आहे. अर्थसंकल्प सादर होण्याच्या दिवशी मी तो अर्थसंकल्प सादर झाल्याक्षणापासून पाच लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केलेले नाही असे माझ्या विवेचनात एका वाहिनीवर वारंवार सांगत होतो. पण ऐकतो कोण?

हा गोंधळ इतका प्रभावी होता की, शेवटी अर्थसंकल्प सादर झाल्यापासून अवघ्या तासाभरात स्वतः अर्थमंत्र्यांना पत्रकार परिषद घेऊन त्याचे निराकरण करावे लागले!

अर्थसंकल्पीय भाषणात रिबेट असाच स्पष्ट उल्लेख आहे. तिथे कुठेही एक्झेम्प्शन असा शब्दच नाही.

रिबेट याचा अर्थ कर भरण्यात सवलत. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर कर देय (पेएबल) आहे; पण

द्यायचा नाही.

एक्झेम्प्शन याचा अर्थ कर देयच नाही; त्यामुळे तो भरण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

रिबेट ही कर भरण्यातली सवलत आहे; तर एक्झेम्प्शन ही कराची आकडेमोड करण्यातली सवलत आहे.

खरं म्हणजे रिबेट आणि एक्झेम्प्शन यातला फरक इतका स्पष्टपणे सांगण्याची एरवी काहीही आवश्यकता नव्हती आणि नाही. पण याबाबत जो गोंधळ उडला किंवा उडवला गेला त्यामुळे हे लिहिले इतकेच!

पाच लाख रुपयांपर्यतचे उत्पन्न या अर्थसंकल्पात कर – मुक्त (टक्स – फ्री किंवा एक्झेम्प्ट) करण्यात येईल अशी चर्चा अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी आपल्या देशात जरूर रंगली होती. पण असं होण्याची सुतराम शक्यता नाही हे माझे आधीही स्पष्ट मत होते. त्याचा सकारण युक्तिवाद करणारा 'पाच लाखाचा पतंग' हा लेख मी अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वीच लिहिला होता. सुदैवाने अनेक नियतकालिकांत तो तेंव्हा प्रसिद्धही झाला होता. आजही तो माझ्या फ़ेसबुक पेजवर (१६ जानेवारी २०१९ पासून) उपलब्ध आहे.

अशी करमुक्तता देऊन लक्षावधी करदात्यांना आयकराच्या जाळ्यातून कोणते सरकार बाहेर जाऊ देईल?

निश्चलनिकरण करणारे सरकार तर तसे नक्कीच करणार नाही हे उघडच होते आणि आहे.

या अर्थसंकल्पातली वैयक्तिक आयकराबाबत असणारी दुसरी तरतूद म्हणजे दुसऱ्या घरावर द्याव्या लागणाऱ्या करात देण्यात आलेली करमुक्तता.

ही करमुक्तता (एक्झम्प्शन) आहे ...रिबेट नाही.

याआधी स्वतःच्या मालकीच्या घराबाबत; पण त्यात ना स्वतः राहात आहेत आणि ना ते भाड्याने दिले आहे ...अशी परिस्थिती असेल तर त्या दुसऱ्या घरावर इनकम – टॅक्स रिटर्न्स भरताना त्या त्या भौगोलिक क्षेत्रातील भाड्याच्या दराचा विचार करून तसे प्रायोजित उत्पन्न (डीएमएड इनकम) दाखवून त्यावर कर भरावा लागत असे.

आता या अर्थसंकल्पानुसार पहिल्या दोन घरांपर्यंत असे करावे लागणार नाही आणि तिसऱ्या घरापासून ही प्रक्रिया सुरू होईल.

आपल्या देशात सेकंड होम किंवा वीकेंड होम याचा ज्या वेगाने प्रसार होत आहे, त्याला सरकारी धोरणाने दिलेली पोचपावती म्हणजे ही तरतूद आहे.

यात राजकारणही आहे आणि अर्थकारणही आहे.

अर्थसंकल्पात ही तरतूद येणे आणि अर्थसंकल्पानंतरच्या GST कौन्सिलच्या पहिल्याच सभेत रियल इस्टेटीवरचे GST चे दर कमी होणे हे काही योगायोग निश्चितच नसतात.

यातलं मध्यावधी निवडणुकांचे राजकारण आणि अर्थकारण जरी सोडलं तरी त्यातून सामोरे येणारे आर्थिक वास्तवही नजरेआड करता येत नाही. राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नाच्या वाढीचा गेल्या काही वर्षांतील आश्वासक दर, गेल्या काही वर्षांत सोन्याच्या मागणीत घट झाली असली, तरी त्याप्रमाणात घरांसाठीच्या मागणीत न झालेली कपात, आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे प्राबल्य वाढत असताना कमी कमी होत जाणारे पहिलं घर घेण्याचं सरासरी वय आणि या सगळ्यांतून दोन घरे असणाऱ्या भारतीय नागरिकांचे लक्षणीय प्रमाण या सामाजिक–आर्थिक वास्तवाला अर्थमान्यता–राजमान्यता–करमान्यता देणारी अशीच ही अर्थसंकल्पीय तरतूद आहे.

या तरतुदीचा विचार करताना एक शंकेची पाल मात्र मनात जरूर चमकते. मुळातच हे अर्थसंकल्पीय भाषण असे आहे की, त्याचा वित्त मंत्रालयाच्या वेब –

साईटवर उपलब्ध असणारा इंग्रजी तर्जुमा (मराठीत सांगायचे तर इंग्लीश टेक्स्ट) आणि अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्र्यांनी लोकसभेत प्रत्यक्षात केलेले भाषण यांत काही ठिकाणी थोडी तफावत आहे. तफावत अशा अर्थाने की, या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांनी सभागृहात जे हिंदी मधे सांगितले त्याचा वेब - साईट वरील भाषणात समावेश नाही. ही तरतूद असणारा अर्थसंकल्पीय इंग्लिश भाषणातला परिच्छेद (पराग्राफ) सुरू करण्याआधी लोकसभेत अर्थमंत्री हिंदी मधे असे म्हणाले की, अलीकडच्या काळात मूळ शहरातील मोठे घर विकून उपनगरात किंवा आजूबाजूला दोन छोटी घरे घेण्याकडे कल वाढतो आहे. अशा लोकांसाठी ही तरतूद करण्यात येत आहे.

ही तरतूद अर्थातच स्वागतार्ह आहे. मनात येणारी भीती किंवा शंका इतकीच आहे की, निवडणुका झाल्यानंतर येणाऱ्या पूर्ण (अंतिम अर्थसंकल्प; अंतरीम नव्हे अशा अर्थाने) अर्थसंकल्पात ही सवलत काही विशिष्ट आकाराच्या घरांसाठी किंवा काही विशिष्ट शहरांसाठी (टायर-१ सिटिज, टायर-२ सिटिज, टायर-३ सिटिज अशा अर्थाने) तर सीमित करण्यात येणार नाही ना?

या अर्थसंकल्पातली अशीच एक लक्षणीय आणि वैशिष्ट्यपूर्ण तिसरी तरतूद म्हणजे व्याजावरील TDS (टक्स डिडक्टेड अट सोर्स) ची मर्यादा सध्याच्या १४००० रुपयांवरून ४०००० रुपयांपर्यत करण्यात आली आहे.

हा कर भरायचा तर आहे; फक्त तो आता वर्षभरात व्याजापोटी मिळालेल्या ४०००० रुपयांपर्यतच्या व्याजातून मुळातच कर कापला जाणार नाही. जर वर्षभरात व्याज म्हणून मिळालेली रक्कम ४०००० रुपयांपेक्षा जास्त झाली तर मात्र अगदी व्याजाच्या पहिल्या रुपयांपासून लागू असणाऱ्या दराने कर कापला जाणार आहे.

ही सोय आहे; करमुक्तता नाही.

असा कर स्रोतातूनच कापला जाऊ नये म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी आपल्या ठेवी विभागून ठेवण्याकडे नागरिकांचा कल वाढत होता. यांतून नागरिक आणि वित्तीय व्यवस्था या दोघांनाही निष्कारण त्रास होत होता . अशा प्रकारच्या सर्वच व्यवहारांत PAN सक्तीची बाब असल्याने सरकारला ही माहिती मिळतच होती. याचे निराकरण म्हणून ही तरतूद.

यांतून समोर येणारे एक आर्थिक - सामाजिक वास्तवही लक्षात घेण्याजोगे आहे.

अर्थसंकल्पीय तरतुदीच्या पलीकडे जात यांतून जे आधुनिक आर्थिक वास्तव लक्षात येत आहे ते लक्षात घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. एकीकडे आर्थिक विकासाचा दर चढता राखण्यासाठी देशांतर्गत बचत आणि गुंतवणुकीचा दर वाढवण्याचे, आणि त्यातही ते बाजाराशी निगडित अशा साधनांकडे वळवण्याचे प्रयत्न सुरू असताना व्याज-दराशी निगडित असणाऱ्या साधनांना अशी सवलत का द्यावी लागत असेल किंवा लागली असेल याचा विचार करण्याची निश्चितच आवश्यकता आहे.

यांत राजकारण जरूर आहे. अगदी आहेच.

पण त्याहीपेक्षा एक निखळ आर्थिक वस्तुस्थिती आहे हे या तरतुदीतून धोरण-कर्ते मान्य करत आहेत.

१९९१ सालापासूनच्या आपल्या देशातील आर्थिक सुधारणांच्या सातत्यपूर्ण कार्यक्रमातून आपल्या देशाच्या आर्थिक विकासाच्या-वृद्धीच्या वार्षिक दरात वाढ झाली आहे इतकेच नव्हे तर आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या संरचनेतही बदल झाला आहे. कृषी आणि उद्योग क्षेत्राच्या ऐवजी आता सेवा क्षेत्र (सर्व्हिसेस सेक्टर) हे आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे सर्वात मोठे अंग बनले आहे. आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५८ टक्क्यांहून जास्त वाटा देणाऱ्या आणि एकूण रोजगाराच्या सुमारे ३५ टक्के भार घेणाऱ्या सेवा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्याचा वयोगट हा साधारण तिशीच्या

आसपासचा आहे. आणि हा गट खऱ्या अर्थाने साधारणतः त्यांच्या वयाच्या २८-२९ व्या वर्षी अर्थार्जनाला सुरवात करतो. कृषी क्षेत्राच्या प्राबल्याच्या जमान्यात हे वय २० तर औद्योगिक क्षेत्राच्या प्राबल्याच्या जमान्यात हे वय २४-२५ च्या आसपास होते. आता या सगळ्यात मोठ्या गटाचा उत्पन्न मिळवण्यात उशीर होत असल्याने, त्यांच्या घरातील आधीच्या पिढीचा गुंतवणूक-योग्य निधी जास्त काळ सुरक्षितता आणि तरलता असले निकष सांगत जास्तीत जास्त काळ व्याजदराशी निगडित साधनात गुंतवला जात आहे. तत्कालीन आणि तात्कालीक राजकारणाच्या पलीकडे जात याचा विचार करणे गरजेचे आहे. (खरं तर हा एका स्वतंत्र लेखाचा विषय आहे.)

याच संदर्भात या अर्थसंकल्पातली लक्षात घेण्याजोगी चौथी तरतूद म्हणजे सर्व इनकम-टॅक्स रिटर्न्सची संगणकीय तपासणी आणि चोवीस तासांत टॅक्स रिफण्ड संबंधित करदात्यांच्या खात्यात जमा होण्याची घोषणा. हे जसे करखात्याच्या तांत्रिक व प्रशासकीय क्षमता आणि तत्परता यांचे द्योतक आहे; तसेच आणि तितकेच ते सर्वसामान्य करदात्यांच्या अगत्याचे आहे. येणाऱ्या काळात करदात्याना स्वतंत्रपणे स्वतःचे इनकम-टॅक्स रिटर्न्स भरावे न लागता आयकर खातेच ते काम करण्याची तर ही नांदी नाही ना ?

अर्थातच तसं होण्यात प्रामाणिक करदात्यांना काहीच अडचण नाही.

**- चन्द्रशेखर टिळक**
सी -४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

(पृष्ठ क्र.१० वरून- **मोदी कालखंडातील भारताचे परराष्ट्र व संरक्षण धोरण** )

एफडीआय कमी होत नाही. इतर देशांबरोबरचे आर्थिक संबंध अधिक मजबूत होत आहेत. हे एक अत्यंत महत्त्वाचे यश आहे. भारताच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वाभिमान वाढवणाऱ्या अनेक घडामोडी गेल्या पाच वर्षांत घडल्या आहेत. भारताला शांघाय सहकार्य संघटना, एमटीसीआर, वासेनार करार, ऑस्ट्रेलिया करार अनेक बहुराष्ट्रीय संघटना व करारांचे सदस्यत्त्व मिळाले आहे. भारताची निवड संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मानवाधिकार सभेवरही झाली आहे. त्यामुळे आज बहुराष्ट्रीय संघटनांचे उद्दिष्ट भारत ठरवू लागला आहे. उदाहरणार्थ, जी-२० परिषदेत काळ्या पैशांचा मुद्दा हा भारताने उपस्थित केला. त्याचबरोबर 'डायस फोरा डिप्लोमसी'. परदेशस्थ भारतीयांचा वापर आपल्या राष्ट्रीय विकासासाठी कसा करता येईल याला प्राधान्य दिले गेले.

**परराष्ट्र धोरणाचा विकास**

मोदी कालखंडामध्ये भारतीय परराष्ट्र धोरणाचा विकास अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पाच टप्प्यांमध्ये घडून येत असल्याचे दिसते. पहिला टप्पा हा दक्षिण आशियाशी, दुसरा टप्पा दक्षिण पूर्व व मध्य आशियाशी, तिसरा टप्पा हा युरोपियन देशांशी, चौथा अमेरिकेशी, तर पाचवा आफ्रिकेशी निगडित आहे. याशिवाय ज्या देशांपर्यंत भारत आजपर्यंत पोहोचला नव्हता अशा देशांपर्यंत मोदी कालखंडात संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला आहे.

**- डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी - ९७०२०३५८००

•••

# प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था

**(भाग–२)**

*श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांचेतर्फे मार्च २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था' हा श्री. मधुकर गजानन दातार यांचा लघुशोध निबंध 'दिशा' च्या वाचकांसाठी क्रमशः प्रकाशित करत आहोत – संपादक*

'ग्राम' नावाच्या नगराचे क्षेत्रफळ 'पुर' नगराच्या अर्ध्या क्षेत्रफळाचे असते. 'खेटक' नावाच्या नगराचे क्षेत्रफळ 'ग्राम' नगराच्या निम्म्या क्षेत्रफळाचे असते. 'खेटकाच्या' निम्मे 'कूट' आणि 'खर्वट' नगराचे क्षेत्रफळ 'कूट' नगराच्या निम्मे असते. 'पुर' नगरांत १७ रस्ते, 'ग्राम' नगरांत ९ रस्ते, 'खेटक' नगरांत ५ रस्ते, तर 'कूटक' नगरात ३ रस्ते असतात. अशा प्रकारे पाच प्रकारच्या विविध नगरांतील रस्त्यांच्या नियोजनाबद्दलची माहिती दिली.

वाहनासाठी चार प्रकारचे हत्ती असतात ते असे – 'भद्रफं', 'मृग', 'मन्द्र' आणि 'संकीण'

विस्तारभयास्तव प्रत्येक हत्तीचे वर्णन दिले नाही.

तसेच आठ प्रकारच्या घोड्यांचाही वाहनासाठी उपयोग होतो.

१) 'तुरक' हे घोडे तुरकस्तांनात असतात. 'तुरक' घोडे सर्व घोड्यांत श्रेष्ठ मानले गेले आहेत. इतर घोड्यांच्या जाती अशा २) 'दक्ष' 'दक्ष' देशातील घोडे, ३) 'महावन' महावन भागातील. ज्या प्रदेशात सर्वत्र अरण्यच आहे तेथे 'महावन' घोड्यांचा वापर करतात, ४) 'प्रान्त' प्रान्त देशातील, ५) 'चण्ड' देशातील घोडे 'चंचल' या नावाने ओळखले जातात. ६) 'वेणा' वेणा नदीच्या तीरावरील घोडे वेणा या नावाने ७) प्रान्त देशातील घोडे 'प्रान्त' या नावाने आणि ८) 'डहाळ' देशातील घोडे डहाळ या नावाने ओळखले जातात. (विस्तार कमी करण्यासाठी घोड्यांचे विस्तृत वर्णन दिले नाही.) रथांचे विविध प्रकार कौटिल्याने 'कौटिलीय अर्थशास्त्रांत' दिले आहेत ते असे. देवांसाठी उत्सवप्रसंगी वापरण्यांत येणारा रथ 'पुष्यरथ' या नावाने, समरप्रसंगी वापरण्यांत येणारा रथ 'संग्रामक' या नावाने, तर प्रवासासाठी वापरण्यांत येणारा रथ 'पारयानिक' या नावाने संबोधला जातो. मुख्य वाहनासाठी प्राचीन काळात रथ वापर असत त्यामुळे त्याबद्दलचे वर्णन संक्षिप्त स्वरूपात देण्यात येत आहे.

उत्तम रथाची उंची १० हात आणि रुंदी १२ हात आणखी सात रथ त्यांच्या आकारमानाप्रमाणे वर्णिले आहेत. रथांची उंची १० हातच ठेवून एकेक हाताने रुंदी कमी करत सर्वांत लहान रथ ६ हात रुंदीचा असावा असे वर्णन कौटिल्याने दिले आहे. वेगवेगळ्या नगरांची वैशिष्ट्ये, त्यांचे क्षेत्रफळ, तेथील प्रमुख वस्ती यांचा उल्लेख २० व्या अध्यायात आला आहे.

'वक्ष्यामि लक्षणं ग्रामनगर्यादिस्समाहितः।
यथावव्दिहितं वास्तु न त्यज्यन्ति देवताः ।।१।।'

आता नगरांच्या विविधता आणि त्यांची वैशिष्ट्ये सांगतो. ज्या नगरांचे नियोजन योग्य पद्धतीने केले आहे अशा नगरांतील वास्तव्य देवतुल्य व्यक्ती कायम ठेवतात. अशा नगरांचा त्याग करीत नाहीत.

'विप्रैर्विद्वभ्दिराभोग्यं मङगलं चेति कीर्तितम् ।
अग्रहारस्तदेवोक्तं विप्रेन्द्राः कामिकाव्दये ।।३।।

(पृष्ठ क्र.१८ वर)

अन्नावरच्या प्रेमाइतके अस्सल असे दुसरे कुठल्याही प्रकारचे प्रेम दाखविता येणार नाही! – बर्नार्ड शॉ

# सण आणि आरोग्य
# गुढीपाडवा, गौरी तीज, रामनवमी, हनुमान जयंती

*चैत्र महिन्यातील महत्त्वाच्या सणांचे आयुर्वेदिक महत्त्व सांगणारा डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी यांचा लेख - संपादक*

**वर्ष प्रतिपदा**

भारतीय संस्कृतीप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदा हाच वर्षारंभ आहे. पंचागवर्ष या दिवसापासून सुरू होते. याच वेळी निसर्गातही बदल व्हायला सुरुवात होते. सगळीकडे चैत्रपालवी फुटते. पूर्वी मंगलप्रसंगी विजयोत्सवाच्या वेळी ध्वज उभारला जात असे. कालांतराने आपल्या देशावर परकीय आक्रमणे झाली. पारतंत्र्य आले. राज्यकर्त्यांनी ध्वजारोहणाला बंदी केली. परंतु पराक्रमी शालिवाहन राजांनी परकीयांची सत्ता उलथवून टाकली. शकांच्या जुलमी राजवटीला शेकडो कुमारिकांची खंडणी द्यावी लागत असे. पराजितांनी या स्त्रियांच्या साडी-चोळीची गुढी उभारावी अशी अट होती. हा अपमानास्पद कलंक धुऊन टाकला शालिवाहन राजवंशाने म्हणून वर्ष प्रतिपदेच्या दिवशी आपला विजयी ध्वज फडकवला जातो.

आपण साडेतीन मुहूर्त मानतो. त्यातील गुढीपाडवा हा एक मुहूर्त.

शालिवाहनाच्या विजयाप्रित्यर्थ हा शालिवाहन शक सुरू झाला.

प्रारंभी ब्रह्मदेवाने जग उत्पन्न केले ते चैत्र शुद्ध प्रतिपदेस होय. असा उल्लेख ब्रह्मांडपुराणात आहे.

उन्मत्त रावणाचा वध करून आपला वनवास संपवून प्रभू रामचंद्र अयोध्येस पोचले तो दिवस गुढी पाडव्याचाच. हा दिवस रामनवरात्रीचा पहिला दिवस असतो. गुढी म्हणजे विजयपताका. भोगावर योगाचा विजय. विकारांवर विचारांचा विजय. दुष्ट प्रवृत्तीचा नाश करण्याची प्रेरणा म्हणून याला राजकीय महत्त्वही आहे. या दिवशी चांगल्या कार्याचा संकल्प करावा. घराघरात शिरलेल्या कुप्रवृत्तीचा नाश करून आनंद उत्साह व यशाची पताका घरावर फडकत ठेवावी.

प्राचीन काळी चेदी देशात वसू नावाचा राजा राज्य करीत होता. धर्मपालन करणारा राजा तपश्चर्या करता असताना त्याला देवाकडून वेळूची काठी मिळाली. राजाने त्या काठीला शृंगारून भक्तिभावाने तिची पूजा करून राजभवनासमोर उभी केली. तेव्हापासून गुढी उभारण्याची सुरुवात झाली.

या दिवशी सर्वांनी पहाटे उठून मंगल स्नान करावे. नवीन कपडे घालावेत (मंगलवेष) : गुढी उभारण्याची जागा स्वच्छ करून रांगोळी काढावी. बांबूची काठी स्वच्छ धुऊन तिच्या टोकास तांबडे वस्त्र, कडूनिंबाची पाने, फुलाची माळ व साखरेची गाठी बांधावी, वर भांडे अथवा लाटी ठेवावी आणि गुढी उभारावी. गुढीची, षोडशोपचारे पूजा करावी. उपचाराच्या वेळी 'ब्रह्मध्वजाय नमः' असे म्हणावे. पूजा पूर्ण झाल्यावर खालील मंत्र म्हणावा.

''ब्रह्मध्वज नमस्तेऽस्तु सर्वाभीष्टफलप्रद।
प्रातेस्मिन वत्सरे नित्य मद्‌गृहे मंगलं कुरु।।'

कडुनिम्बाची कोवळी पाने, फुले घेऊन ती वाटावी व त्यात मिरी, ओवा, मीठ, गूळ, चिंच वगैरे घालावीत. गुढीला प्रसाद दाखवून तो भक्षण करावा.

या प्रसादात षड्रसाचा समावेश आहे. कडुनिम्बाला विशेष प्राधान्य दिले आहे. निंबू कडू आहे पण आरोग्यदायक आहे. जीभेला कष्ट देऊन आरोग्याचे कल्याण करणारा आहे. या काळात विशेषतः कफ

ज्याचे सारे आयुष्य आहारनिद्रेत जाते, तो केवळ पशू. - शेक्सपीअर

वाढतो. ह्या वरील प्रसादातील सर्व घटक कफ नाशक आहेत. सर्दी, खोकला, घसा दुखणे, ताप, कणकण हे सगळे कफज रोग कमी होतात. म्हणून कडूनिम्बाचे सेवन करणारा सदा सुखी असतो. कित्येक विचार आचरणात आणताना कष्ट पडतात. एवढेच नाही तर कटू वाटतात. पण तेच विचार जीवन उदात्त बनवतात.

प्रगतीपथावर जाणाऱ्या प्रत्येकाला 'कडू घोट' प्यावे लागतात. ह्याची ही सूचना मिळते.

मंदिरातही हाच प्रसाद मिळतो. कडूनिंब, साखर, ओवा, गूळ, मिरी हा मिश्र प्रसाद म्हणजे सर्व रसांचे मिश्रण आहे. आपल्या जीवनातही सुखामागे दुःख व दुःखामागून सुख येतेच. असे हे सुख, दुःख, आनंद, राग, यश, अपयश यांचे मिश्रण आपल्या जीवनातही असते. ते आपण या प्रसादाप्रमाणे स्वीकारावे ही प्रेरणा.

या दिवशी पंचांगाचे पूजन करावे. सुग्रास भोजन करावे आणि संपूर्ण दिवस आनंदाने साजरा करावा. या दिवशी प्रत्येकाने पवित्र संकल्प करावा. तो संकल्प वर्षभर पाळावा. सायंकाळी गुढीला हळदीकुंकू, अक्षता वाहाव्यात व गुढी उतरवावी.

**गौरी तीज**

चैत्र शुद्ध तृतीयेला 'गौरीची तीज' म्हणतात. या दिवशी वसंतगौरीची स्थापना केली जाते. हा उत्सव वैशाख शु. तृतीयेपर्यंत (अक्षयतृतीया) स्त्रिया साजरा करतात. गौरीला शृंगार करून उच्चासनावर बसवले जाते. तिच्या भोवती उत्तम आरास केली जाते. सुवासिनी स्त्रियांना हळदी कुंकवासाठी बोलवतात. त्यांची ओल्या हरभऱ्यांनी ओटी भरतात. तसेच कैरीचे पन्हे दिले जाते. कैरीच्या पन्ह्यामुळे वारंवार लागणारी तहान शमते आणि शरीरात पाण्याचे प्रमाणही योग्य राखले जाते आणि ऊर्जाही मिळते. उत्साह वाढतो. ते सद्यप्रसरन म्हणजे पटकन ऊर्जा देणारे पेय आहे. म्हणून हे चैत्रातील उष्णतेवर उपयोगी आहे. गौरीपुढे फुगड्या, देवीची गाणी गायली जातात. सायंकाळी विसर्जन करतात. या उत्सवामुळे समाजात एकमेकांबद्दलची आदरभावना वाढते. समाजात सामंजस्य निर्माण करण्यासाठी अनेक स्त्रिया हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करतात. जास्तीत जास्त महिलांना एकत्र बोलवावे. आलेल्या महिलांना नमस्करही करावा. याचा समाजातील अनेक विधायक कामांसाठी उपयोग होतो.

**रामनवमी**

चैत्र शुद्ध नवमी हा दिवस रामनवमी म्हणून संपूर्ण भारतात साजरा केला जातो. या दिवशी दुपारी १२ वाजता पुनर्वसु नक्षत्रावर, पाच ग्रह उच्चस्थानी असताना झाला, अधर्माचे स्खलन व धर्माचे उत्थान करण्यासाठी इश्वाकू वंशात राजा दशरथ आणि कौशल्या यांच्या पोटी रामचंद्रानी जन्म घेतला. श्रीरामाला आपण विष्णुचा सातवा अवतार मानतो.

श्रीरामचंद्राचे जीवन हे भारतीयांचे आदर्श जीवन म्हणून संपूर्ण जगात गौरविले जाते. आपल्या घरातील मुला-मुलींना रामायणातील आदर्श समजावून सांगावेत.

रामाच्या जीवनात असलेल्या सद्‌गुणांनाही रामनवमीच्या निमित्ताने समजून घेतले पाहिजे. रामाची मातृपितृभक्ती अनुकरणीय आहे. वडिलांचा शब्द तात्काळ मान्य अशा प्रकारची प्रसन्नता म्हणजेच राम.

राम आणि सुग्रीवाची मैत्री आदर्श होती. ते दोघेही एकमेकांची कामे मोठ्या आनंदाने करीत होते. रामाने स्वतःमध्ये आणि सुग्रीवामध्ये भेद केला नाही. म्हणून रामाने जेव्हा शरयूमध्ये प्रवेश केला तेव्हा किष्किंधेहून सुग्रीव धावत आला व स्वतःही रामाबरोबर शरयूमध्ये प्रवेश केला. असे त्यांचे मित्रप्रेम आहे.

लोकोत्तर शत्रू रामच. रावणवधानंतर बिभीषण त्याचे अग्निसंस्कार करायला नकार देतो. त्यावेळी राम त्याला सांगतो, ''मरणाबरोबर वैर संपते. तेव्हा भाऊ म्हणून शोभेल असा अग्निसंस्कार कर तू. नाही केलास तर मी करीन.'' लोकोत्तर वल्लभ म्हणजे राम. रामाचे सीतेवर अलौकिक अमर्याद प्रेम होते. सीताही जन्मोजन्मी रामच पती लाभावा

अशी कामना करते. या रीतीने पाहता रामाचा सीतात्याग हे आत्मबलिदानाच्या उच्चतम भावनेचे प्रतीक आहे.

रामाला स्वतःची जन्मभूमी फारच प्रिय होती. म्हणून वालीला मारल्यानंतर किष्किंधेचे राज्य सुग्रीवाला दिले आणि रावणाला मारल्यानंतर लंकेचे राज्य बिभीषणाला दिले. ही राज्ये समृद्ध होती. पण रामाने त्यांचा मोह धरला नाही.

असे सर्व गुण आत्मसात करण्यासाठी व त्याचे विचार व संस्कृती समाजात टिकवून ठेवण्यासाठी आपण कृतनिश्चयी बनलो तरच खऱ्या अर्थाने रामनवमी साजरी केली असे म्हणता येईल.

**हनुमान जयंती**

जगातील सात चिरंजीवांपैकी श्रीरामभक्त हनुमंताचा जन्म चैत्र शुद्ध पौर्णिमेला झाला.

मारुती हे शक्तीचे दैवत आहेत. प्रभू रामचंद्रांची भक्ती, सेवा करून त्याने आपली कीर्ती अजरामर केली. तो बुद्धिमत्तेचे, त्यागाचे,पराक्रमाचे प्रतीक आहे. हनुमंताचा दास्यभावही उत्कृष्ट आहे. रामावरची भक्ती कधीही कमी न व्हावी. रामाशिवाय दुसरा भाव निर्माण न व्हावा असे त्याला वाटे.

हनुमंत म्हणजे सेवक आणि सैनिक यांचा संयोग. भक्ती व शक्ती यांचा सुरेख संगम.

रामाच्या संस्कृतीचे रक्षण करणाऱ्या दास मारुतीची आज समाजाला गरज आहे. रावणी विचार व वृत्ती यांचे दहन करणाऱ्या वीर मारुतीची गरज आहे. तसे होण्याचा प्रयत्न केला तर खऱ्या अर्थाने हनुमान जयंती साजरी होईल.

हनुमान जयंतीच्या दिवशी सूर्योदयाचे वेळी जन्मोत्सव साजरा केला जातो. कीर्तन भजन केले जाते.

अशा चैत्र महिन्यातील हे सर्व उत्सव आपण शास्त्रार्थ लक्षात घेऊन डोळसपणे साजरे केले पाहिजेत.

**– डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी**

(पृष्ठ क्र.१५ वरून - **प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था**)

विप्र आणि विद्वान यांचे निवासनगर 'मङगलं' या नावाने ओळखले जाते. तेच नगर 'अग्रहार' या दुसऱ्या नावाने पण ओळखले जाते.

'विप्रैस्थान्यैर्वर्ण्यैर्वा भोग्यो उदाहृतः ।
एको ग्रामणिको यत्र सभृत्यपरिचारकः ।।४।।
कुक्तिं तव्दिजानीयादेकभोगस्सएव तु ।।४ १/२'

विप्र आणि स्थानिक जन राहणारे नगर 'ग्राम' या नावाने ओळखले जाते. जेथे फक्त एकच कुटुम्ब रहाते ते स्थान 'कुक्तिम' या नावाने ओळखले जाते.

'जनैः परिवृतं द्रव्यक्रयविक्रयादिभिः ।।५।।
अनेक जातिसंयुक्तं कर्मकारैस्समन्वितम् ।
सर्वदैवतसंयुक्तं नगरं चाभिधीयते ।।६।।'

जेथे खरेदीविक्रीचे व्यवहार चालतात आणि जेथे अनेक जातींची वस्ती असते आणि जेथे (कथा-किर्तनासाठी) देवालयांची स्थापना केली जाते त्या स्थानाला 'नगर' असे संबोधले जाते.

'वणिजामपि भोग्यं तु तद्वदेव समीरितम् ।
यत्स्थानं ब्राह्मणानां तु खर्वटं पुरवासिनाम् ।।७'

व्यापारी आणि ब्राह्मण (विद्वान लोक) जेथे एकत्र राहातात त्या स्थानाला 'खर्वट' असे संबोधले जाते.

'तेषामेव वनस्थानं तद्वदेव समीरितम् ।
क्रयविक्रयसंयुक्तमब्धितीरसमाश्रितम् ।।७।।'

(क्रमशः)

**– मधुकर गजानन दातार**

•••

ज्याला नीट खायला-प्यायला मिळते, त्याने आपले कर्तव्यही चोख बजावावे. - थॉमस फुलर

# आनंदाचा मागोवा

*ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात १८ आणि १९ जानेवारी रोजी 'आनंदाचा मागोवा' या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. त्या परिषदेचा आढावा - संपादक*

सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत्।

या ओळींचा अर्थ असा होतो की, सर्वजण आनंदी राहावेत, रोगापासून मुक्त राहावेत, सर्वजण मंगलमय घटनांचे साक्षीदार व्हावेत व कोणीही दुःखाचे भागीदार होऊ नयेत.

आनंद म्हणजे नक्की काय ? प्रत्येकाची आनंदाची व्याख्या वेगळी असते. उदाहरणार्थ पाहता, कोणाला पहिल्या पावसाच्या सरीतून निर्माण झालेला मातीचा दरवळणारा सुगंध आनंद देतो, तर कोणाला पहिल्या पावसात गरम गरम कांदा भजीचा सुगंध आनंद देतो. जेव्हा पावसामुळे पिकांची भरभराट होते तेव्हा आपल्या शेतकरी राजाला आनंद होतो, पीकेही शिवारामध्ये वाऱ्यासह आनंदाने डोलत असतात. तर पावसामुळे अचानक मिळणाऱ्या सुट्ट्या लहान मुलांना आनंद देऊन जातात. प्रत्येकासाठी वेगवेगळ्या गोष्टींमध्ये आढळणारा असा हा आनंद. पण आनंदाची निश्चित व्याख्या काय? तो मिळवण्यासाठी कोणत्या दिशेने आपण आपली पावले उचलावीत? आनंद म्हणजे नेहमी उल्हासित असणे का?

या सर्व प्रश्नांची योग्य ती उत्तरे मिळावीत म्हणून ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात १८ आणि १९ जानेवारी रोजी 'आनंदाचा मागोवा' या विषयावर २ दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. या प्रसंगी अनेक विद्वानांची उपस्थिती लाभली. यामध्ये डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. प्रदीप गोखले, डॉ. सुभाषचंद्र भेलके, डॉ. नीता मेहता, डॉ. आकाश सिंग राठोर तसेच भारताबाहेरील ज्येष्ठ अभ्यासक डॉ. फ्रँकलिन अबॉट, डॉ. मायकल शूज यांचीही मोलाची उपस्थिती लाभली.



प्रमुख पाहुणे व महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देत प्रमुख पाहुण्यांना गौरविण्यात आले. उद्घाटन सत्राच्या वेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. नाईक म्हणाल्या, ''यंदाचे हे परिषदेचे १५ वे वर्ष. या वर्षी महाविद्यालयातील ख्रिसलीस, गंधर्व, ऋत या सर्वच कार्यक्रमांचा विषय 'आनंद' हा असून, आपण सर्वच संपूर्ण वर्षभरात आनंदाच्या दिशेने वाटचाल करत आहोत. या परिषदेतील प्रमुख पाहुणे डॉ. आनंद नाडकर्णी हे आपल्याच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. सुवर्णमहोत्सवी वर्षात ते आपल्या महाविद्यालयात येणं हा एक अर्थपूर्ण योगायोगच म्हणावा. भेलके सरांनी म्हटल्याप्रमाणे, ''आपण आनंद अवस्थेच्या जवळ असतो, पण ती गोष्ट आपल्या लक्षात येत नाही, हे चिंता करण्यासारखे आहे.''



दिवसागणिक आनंद हा मृगजळासारखा होत आहे. आज सोशल मीडियावर अनेक इमोटीकॉन्स उपलब्ध आहेत जे आपण दैनंदिन जीवनात वापरत आहोत, पण खऱ्या आयुष्यात आपण किती आनंदी आहोत हेच आपण विसरत जात आहोत. सोशल मीडियावर आपण एकमेकांना अनेक आनंदी इमोटीकॉन्स पाठवत आहोत परंतु आजकाल जेव्हा आपण भेटतो तेव्हा मात्र फार क्वचित आपण एकमेकांशी हसतो इ. अशी खंतही त्यांनी व्यक्त केली व उपनिषदातील

सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत् ।

या ओळींचा आधार घेत व सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करत त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर ह्यांनी दृकश्राव्य माध्यमातून सर्वांना आपले मत सांगितले. ''आनंदाची व्याख्या करता येत नाही. मिळणाऱ्या प्रत्येक गोष्टींतून तुम्ही समाधानी होणे म्हणजे आनंद नव्हे. तुमच्या व्यवसायात आनंदी राहणं म्हणजे आनंद. जीवनात संतुलन असणे म्हणजे आनंद. प्रत्येक व्यक्ती ही आनंदी असली पाहिजे. तुम्ही स्वतःच स्वतःशी आनंदी असले पाहिजे. कारण आनंद ही अशी गोष्ट आहे जी कोणी तुम्हाला पुरवणार नाही. आयुष्यात तुम्ही कोणत्याही टप्प्यावर असा, तुम्ही आनंदी असले पाहिजे,'' असे ते म्हणाले.

यानंतर डॉ. आनंद नाडकर्णी यांनी अत्यंत सखोलपणे आनंद या विषयावर भाष्य केले. डॉ. नाडकर्णी हे बेडेकर विद्यामंदिर व जोशी-बेडेकर महाविद्यालयाचेच माजी विद्यार्थी. इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ येथे ते सल्लागार मनोचिकित्सक म्हणून कार्यरत आहेत. डॉ. नाडकर्णी हे एक अतिशय उत्तम लेखकही आहेत. त्यांची मुक्तीपत्रे, एका सायकिॲट्रिस्टची डायरी, मनोविकास, देवराईच्या सावलीत, जन्म रहस्य, स्वभाव विभव, मनोगती अशी अनेक पुरस्कारप्राप्त पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांना 'ठाणे नगर रत्न','ठाणे भूषण','समाज शिक्षक सन्मान', साहित्यिक योगदानासाठी 'पी. सावळाराम स्मृतिचिन्ह', वैद्यकीय पत्रकारितेसाठी 'शतायुषी पुरस्कार' अशा अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे. देवराई हा त्यांचा सिनेमाही प्रसिद्ध आहे.

आनंद ही संकल्पना समजावून सांगताना ते म्हणाले, 'आनंद ही एक भावना, एक सुखद अनुभव आहे. आनंदाचे दोन प्रकार आहेत. 'अनुभूती' आणि 'अभिव्यक्ती'. अनुभूती म्हणजे ऊर्जा आणि ऊर्जेचा परिणाम म्हणून अंतरंगातून येणारे भाव म्हणजे अभिव्यक्ती. अनुभूतीशिवाय अभिव्यक्ती असू शकत नाही. आनंदाची जाणीव असणे गरजेचे आहे. आनंद हा स्वतःशी निगडित आहे. ती एक भावना व सुखद अनुभव आहे जो आपल्याला सुखापर्यंत पोहोचवू शकतो. आनंद हा एक अनुकूल प्रतिसाद आहे. याशिवाय कलाकृती आनंद म्हणजे नवनवीन तंत्रज्ञान, अमूर्त आनंद म्हणजे प्रतीकं, सप्तक, सूर, भाषा इ., सर्जनशील आनंद, परमानंद हे सर्व आनंदाचे निरनिराळे प्रकार आहेत. यानंतर येतं ते म्हणजे साधना आणि कैवल्य या दोन एकमेकांवर विसंबून असणाऱ्या बाबी. योग्य पद्धतीने सराव करणे म्हणजे साधना होय. कैवल्य म्हणजे मोक्ष, मुक्ती. साधना केल्याशिवाय कैवल्य प्राप्त होऊ शकत नाही आणि कैवल्य प्राप्त करायचे असेल तर साधना करण्याशिवाय अन्य कोणता पर्याय नाही. आपल्या मनात एक भावनिक संग्रहालय असते. आनंद ही एक

संपूर्ण प्रणाली आहे जिथे सर्व गोष्टी आनंदाने एकत्र येतात.'' Rather than snatching happiness, let's shape happiness. Let's explore happiness, because we have choice... असे अत्यंत सुंदर वाक्य म्हणत त्यांनी आपले भाषण संपवले.

डॉ. राठोर यांनी 'युडायमोनिया' ही संकल्पना काय आहे हे समजावून सांगितले. हा एक ग्रीक शब्द असून याचा साधारण अर्थ आनंद किंवा स्वास्थ्य असा घेतला जातो. या शब्दाची फोड अशी होते. 'Eu' म्हणजे चांगली, सकारात्मक गोष्ट तर 'Daimonia' म्हणजे आत्मा. नैतिक तत्त्वज्ञानात, युडाइमोनियाचा वापर योग्य क्रियांचा संदर्भ घेण्यासाठी केला जातो ज्याचा परिणाम एखाद्या व्यक्तिच्या स्वास्थ्यावर होतो. युडाइमोनिया म्हणजे चांगला अभिभावक आत्मा असणे होय. इतर प्राचीन विचारवंतांप्रमाणे, सॉक्रेटीस विश्वास ठेवतात की, मनुष्यांकडे इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा युडाइमोनियाची स्थिती अधिक आहे. तथापि, सॉक्रेटीसचा असा विश्वास होता की न्याय, धैर्य, आत्म-नियंत्रण आणि बुद्धी यासारखे गुण आवश्यक होते आणि युडाइमोनिया प्राप्त करण्यासाठी पुरेसे होते.त्याच्या मते सद्गुण, चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही ज्ञानाचा एक प्रकार होता जो सर्व मनुष्यांना इच्छित असणाऱ्या युडाइमोनिया प्राप्त करण्यासाठी अत्यंत आवश्यक होता.

दुसरीकडे अरिस्टोटलने यावर जोर दिला की, युडाइमोनिया हा तर्कशुद्ध क्रियाकलापांनी बनलेला आहे जो शक्ती, सन्मान किंवा सामर्थ्याऐवजी पुण्याशी संबंधित आहे. दुसरीकडे प्लेटोने असे सुचविले की, जेव्हा एखादा 'वाईट' माणूस काहीतरी चुकीचे करतो तेव्हा त्या व्यक्तीस त्याच्या कृत्यांसाठी शिक्षा भोगण्याची भीती नसली तरीदेखील ती व्यक्ती स्वतःला दोषी मानण्याची शक्यता असते.जे चुकीचे आहे ते करून, माणूस दुःखी होईल. एपीक्यूरससह हेडोनिस्ट्स यांनी मान्य केले की युडाइमोनिया हा सर्वात चांगला आहे. आनंद हीच एक गोष्ट आहे जी मनुष्य स्वतःच्या फायद्यासाठी महत्त्वाची मानतो, असे त्याने सांगितले. तर स्टॉक्सचा असा विश्वास होता की, युडाइमोनिया हा काही प्रमाणात उच्चतम चांगला होता, पण त्यांचा असा विश्वास होता की, पुण्य आवश्यक आहे आणि युडाइमोनियासाठी पुरेसे आहे. स्टॉक्सने हे देखील लक्षात घेतले की, युडाईमोनियन जीवन नैतिकदृष्ट्या गुणी जीवन आहे. निष्कर्ष काढता असे लक्षात येते की, एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याच्या गुणवत्तेच्या आकलनाशी आनंदाचा जवळचा संबंध जोडलेला असतो, जो पूर्णपणे व्यक्तिमत्त्वपूर्ण असतो, युडाइमोनिया जीवनाशी संबंधित एक महत्त्वाचे उद्देश म्हणून अधिक संबंधित आहे.



यापुढे परिषदेत 'Discourse of Happiness या विषयावर परिसंवाद झाला. प्राध्यापक प्रशांत धर्माधिकारी यांनी निमंत्रितांशी संवाद साधला. या परिसंवादामध्ये एस.आय.इ.एस. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उमा शंकर, सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे माजी प्राध्यापक डॉ. सुभाषचंद्र भेलके,वझे-केळकर महाविद्यालातील मानसशास्त्राच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. नीता मेहता यांच्यामध्ये एक सखोल चर्चा झाली. या चर्चेमध्ये 'आनंद' संबंधीच्या अनेक गोष्टींचा उलगडा झाला. आनंदाचे परिमाण, त्याचे वेगवेगळे स्तर, त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, मोक्ष आणि आनंद इ. अनेक विषयांवर चर्चा झाली. यानंतर अनेक अभ्यासकांनीही त्यांच्या संशोधन कार्याचे सादरीकरण करत परिषदेचा एक भाग बनले. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय परिषदेचा पहिला दिवस संपन्न झाला.

गौतम बुद्ध यांच्या काही संदेशांचा उल्लेख येथे मला करावासा वाटतो – *Happiness does not depend on what you have or what you are. It solely relies on what you think.

*A man asked lord Buddha, "I want happiness." Lord Buddha said, "first remove "I' that's ego. Then remove "want' that's desire. See now you are left with only happiness."

दुसऱ्या दिवशी डॉ. उर्मी बिस्वास यांच्या संशोधन कार्याच्या सादरीकरणाने परिषदेची सुरुवात झाली.त्यांनी सेलिग्मन याचे परमा (PERMA) मॉडेल स्पष्ट केले.

PERMA म्हणजे– Positive emotion<br>Engagement<br>Relationships<br>Meaning<br>Achievement

आपल्या आयुष्यात आनंद कसा समाविष्ट करता येऊ शकतो याचे स्पष्टीकरण परमा मॉडेल मधून मिळते. जागतिक आनंद अहवाल २०१८ प्रमाणे डेन्मार्क, स्वित्झर्लंड, नॉर्वे आणि आता फिनलँड हे सर्वात आनंदित देश म्हणून पहिल्या ४ क्रमांकांवर आहेत. उत्पन्न, निरोगी जीवन, सामाजिक आधार, स्वातंत्र्य, विश्वास, उदारता हे सहा घटक या देशाच्या कल्याणाचे आधारस्तंभ आहेत. भारताने त्याच्या समृद्ध वारसा आणि परंपरेमुळे आनंद शिकवण्याकरिता खूप योगदान दिले आहे.

बाहेरील घटनांशी आनंदाचा काही संबंध नाही. तो आपल्याशीच निगडित असतो. तो सहजासहजी मिळत नाही. 'ACT HAPPY' या प्रयोगानुसार आपल्याकडे इतरांवर प्रभाव पाडण्याची शक्ती आहे ज्याच्या परिणामार्थ आपल्यावरही प्रभाव पडेल. एकदा डेविड गिफ़्फेन यांनी बार्बरा वॉल्टर्स यांची मुलाखत घेतली. त्यांनी वॉल्टर्स यांना प्रश्न विचारला की, 'तुम्ही अरबपती आहात, तर तुम्ही आनंदी आहात का?' त्यावर त्यांनी असे उत्तर दिले की, 'जे असं म्हणतात की ते पैशांमुळे आनंदी आहेत, त्यांच्याकडे आनंद नसतो. म्हणजेच आनंद ही एक अशी गोष्ट आहे जी पैशाने विकत घेता येऊ शकत नाही.'

आनंदी राहण्यासाठी स्वतःशी संवाद साधणे फार गरजेचे आहे. स्वतःशीच 'मी आनंदी आहे, मी हे करू शकते, मी हे करणारच असे संवाद साधावेत. नकारात्मक विचार करणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहावे, नेहमी इतरांना आनंद देताना स्वतःला आनंदित करण्यावर जास्त भर दिला पाहिजे.आयुष्याने आघात केला तर आनंद हा त्यावरील उपचार आहे. तुम्हाला आवडत असणाऱ्या गोष्टींकडे स्वतःला गुंतवून घ्या. बुद्ध म्हणतात –'आनंद हा एक प्रवास आहे, गंतव्य स्थान नाही.'

मायकल शूज यांनी आनंद आणि जीवन या विषयावर भाष्य केले. त्यांनीसुद्धा पुन्हा एकदा युडायमोनिया या संकल्पनेचा उल्लेख केला. ॲरिस्टोटल यांच्या मतांवर त्यांनी जास्त भर दिला. तसेच त्यांनी महात्मा गांधी यांच्या 'सर्वोदय' या तत्त्वज्ञानानावर जोर दिला. सर्वोदय हा एक संस्कृत शब्द आहे ज्याचा अर्थ 'सार्वभौमिक उन्नती' किंवा 'सर्वांचा विकास' होय.

यानंतर पुन्हा एकदा happiness कॅलीडोस्कोप या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली. यामध्ये मॅनेजमेंट कोचिंग आणि ग्रुप डायनॅमिक्स मध्ये विशेष मानसशास्त्रज्ञ डॉ. जोहान मार्टइन्स, रोटरी आंतरराष्ट्रीय जिल्हा प्रशासक कॅथलीन, स्वामी श्रीकांतानंद आणि एम. एस. विद्यापीठ वडोदरा येथील मानसशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. उर्मी बिस्वास यांचा समावेश होता.



स्वामी श्रीकांतानंद यांनी सत् (अस्तित्व), चित (चेतना) आणि आनंद या संकल्पना काय आहेत हे सांगितले. ते म्हणाले, ''प्रत्येकाला आनंदी व्हायचं आहे, देवाला इतरत्र शोधायची गरज नाही. तो तुमच्यातच सामावलेला आहे. फक्त तुम्ही त्याकडे लक्ष देणे जरुरीचे आहे. जर तुम्हाला आनंद पाहिजे असेल तर तुम्हाला आधी दुःखाला सामोरे जावे लागेल. दुःखाशिवाय आनंद नाही.




परिषदेच्या शेवटच्या सत्रात डॉ. रवींद्र कोल्हे यांची मुलाखत घेण्यात आली. त्यांनी मेळघाट सारख्या दुर्गम भागात आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. तेथील लोकांना चांगल्या आरोग्य सुविधा त्यांनी उपलब्ध करून दिल्या. मुलाखत देत असताना त्यांनी सांगितले की, गांधी आणि विनोबा भावे यांच्या पुस्तकांनी त्यांना अत्यंत प्रेरित केले होते. त्यांनी एमबीबीएस पूर्ण केल्यानंतर, पैसे कमविण्यासाठी नव्हे तर सर्वात गरजू लोकांना मदत करण्यासाठी आपली कौशल्ये वापरण्याचा निर्णय घेतला. डॉ. कोल्हे यांनी काही वैद्यकीय सुविधांपासून वंचित असलेल्या ठिकाणी त्यांची सेवा देऊ इच्छित असल्याचा निर्णय घेतला. त्यांनी महाराष्ट्रातील मेळघाट येथील एक लहान गाव बैरागड निवडले. मेळघाटची यात्रा अमरावती येथून सुरूझाली आणि सर्व प्रवास हरिसाल येथे संपला, जिथून बैरगडला पोहोचण्यासाठी त्यांना ४० किमी अंतर चालावे लागणार होते. डॉ. कोल्हे यांचे प्राध्यापक डॉ. जजू यांच्या मते, अशा दूरस्थ ठिकाणी काम करणाऱ्या कोणत्याही डॉक्टरला तीन गोष्टी जाणून घेणे आवश्यक आहे. प्रथम, सोनोग्राफी किंवा रक्तसंक्रमणाच्या सुविधाशिवाय बाळाला कसे वितरित करायचे. दुसरे, एक्स-रे शिवाय निमोनियाचे निदान कसे करावे. आणि तिसरे, अतिसार कसा बरा करावा. ह्या तीनही गोष्टी शिकण्यासाठी डॉ. कोल्हे सहा महिने मुंबईत राहिले आणि मग बैरगडला आले. डॉ. कोल्हे यांना पुन्हा मेळघाटला परत यायचे होते परंतु एकट्याने नाही. त्यांनी स्वतःसाठी एक खरी साथीदार शोधायला सुरुवात केली. परंतु त्याला चार अटी होत्या. प्रथम, मुलगी ४० किमी (बयारागड पोहोचण्यासाठी लागणारे अंतर) चालण्यासाठी तयार असावी. दुसरी, ती 'रु. ५ विवाह'(त्या वेळी न्यायालयीन विवाह ५ रुपये) करण्यासाठी तयार असावी. तिसरी गोष्ट म्हणजे ४०० रु. दरमहा (डॉ. कोल्हे प्रति रुग्णांद्वारे प्रति. १ रु.घेत असत आणि असे दरमहा सुमारे ४०० रुग्ण होते) यामध्ये तिला घर चालवता आले पाहिजे. आणि शेवटी, ती स्वतःसाठी नव्हे तर इतरांच्या कल्याणासाठीही, विनवणी करण्यास तयार असावी. जवळजवळ १०० मुलींनी नकार दिल्यानंतर शेवटी डॉ. स्मिता यांनी डॉ. कोल्हे यांच्या सर्व अटींसह त्यांचा प्रस्ताव स्वीकारला. आणि म्हणून, १९८९ मध्ये मेळघाटला दुसरा डॉक्टर मिळाला. या डॉक्टर जोडप्याची दीर्घ लढाई आता संपली आहे आणि आता मेळघाटमध्ये चांगले रस्ते, वीज आणि १२ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. डॉ. कोल्हे आता आपल्या रुग्णांकडून कोणतेही शुल्क आकारत नाहीत. ते त्यांना सरकारी रुग्णालयात घेऊन जातात आणि त्यांना सर्वोत्तम उपचार मिळतील हे सुनिश्चित करतात.

अशा रीतीने तत्त्वज्ञान, मानसशास्त्र व समुपदेशन विभागाने आयोजित केलेली ही आगळीवेगळी परिषद अत्यंत उत्कृष्टपणे पार पडली. या परिषदेस महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

Happiness is something that multiplies, when it is divided. – Paulo Coelho

**– गौरी अंबाजी परब**
जोशी-बेडेकर महाविद्यालय
द्वितीय वर्ष – बी.एम.एम.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### जागतिक मराठी दिन

जागतिक मराठी दिनानिमित्त इ. ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांनी मराठी लोककला, लोकसाहित्याचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा यासाठी आगळ्यावेगळ्या पद्धतीने 'मराठी दिन' साजरा केला. यात भारूड, काव्यवाचन, विविध बोलीभाषा, पोवाडा, बुरगुंडा, फटका, मराठी गौरव गीत, नाटिका इ. सादर केले. याप्रसंगी एकात्मिक बालविकास सेवा योजना, बालविकास प्रकल्प अधिकारी, नागरी ठाणेचे प्रकल्प अधिकारी मान. श्री. अशोक बागुल व त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

### विज्ञान दिन व आनंद मेळावा

२८ फेब्रुवारी विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना विज्ञान दिनाचे महत्त्व सांगितले. तसेच इ.५वी ते ९वीचे जवळजवळ १२० विद्यार्थी विज्ञान प्रदर्शनात सहभागी झाले होते. प्रदर्शनात एकूण ६० प्रयोग मांडण्यात आले होते. सदर प्रदर्शनाचे परीक्षक होते विज्ञान शिक्षक श्री. सोरटे सर, श्री. खैरनार सर. जास्तीत जास्त पालकांनी व विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट द्यावी. तसेच विज्ञानाची गोडी वाढावी यासाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या दिवशी विद्यार्थ्यांनी आनंद मेळाव्याचाही आनंद लुटला. आनंद मेळाव्यात सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने विविध खाद्यपदार्थांची विक्री केली.

### पारिजातक प्रकाशन

इ.१०वीच्या शुभेच्छा समारंभ प्रसंगी 'पारिजातक' या वार्षिक अंकाचे प्रकाशन माजी विद्यार्थी डॉ. सागर आंब्रे (कॅन्सर स्पेशालिस्ट) यांच्या हस्ते झाले. समारंभाचे प्रमुख पाहुणे होते मान. श्री. सतीश नायकोडी (अभिनेता), तर शुभेच्छा समारंभाचे पाहुणे होते माजी विद्यार्थी श्री. कौस्तुभ बांबरकर. समारंभाचे पाहुणे व सर्व शिक्षकवृंद यांनी इ.१०वीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबिर

दिनांक १९ मार्च रोजी शाळेच्यावतीने पालकांसाठी विद्यालंकार सभागृहात स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी श्रीमती अलका देवरे यांनी उद्योग व्यवसायांचे प्रशिक्षण, स्वयंरोजगारांच्या विविध संधी, शासकीय योजना, आर्थिक नियोजन यासंबंधी पालकांना मार्गदर्शन केले. सदर शिबिरास सुमारे दीडशे पालक उपस्थित होते.

### हस्तकला प्रदर्शन

२९ मार्च २०१९ रोजी वार्षिक हस्तकला प्रदर्शनाचे आयोजन हस्तकला वर्गात केले गेले. प्रदर्शनाचे उद्घाटन वारली चित्र तज्ज्ञ श्रीमती राजश्री रढे, श्रीमती अलका देवरे यांच्या हस्ते झाले. सदर प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी वर्षभरात तयार केलेल्या वस्तूंबरोबरच टाकाऊपासून टिकाऊ वस्तू, शोभेच्या वस्तू, उपयोगी वस्तू मांडण्यात आल्या होत्या.

### गुढीपाडवा-शोभायात्रा

गुढीपाडव्यानिमित्त काढण्यात येणाऱ्या शोभायात्रेत स्काऊट-गाईड विभागातर्फे बॅण्डपथक व लेझीम पथक सहभागी होऊन आपली कला सादर करणार आहेत.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**मार्च व एप्रिल महिन्यांतील उपक्रमांचा आढावा**

**दुसरे सत्र-निरीक्षण (Observation)**

दुसऱ्या सत्रात शिकवलेल्या विविध विषयांचे निरीक्षण १८ मार्च ते १५ एप्रिल या दरम्यान घेण्यात आले. गणित, भाषा परिसर अभ्यास तसेच शारीरिक शिक्षक व चित्रकला, हस्तव्यवसाय या सर्वच विषयांचे निरीक्षण घेतले गेले.

**होळी - २० मार्च**

होळी आणि रंगपंचमी या विषयीची माहिती शिक्षकांनी मुलांना सामुहिक प्रार्थनेनंतर दिली. होलिकाची गोष्ट तसेच रंगपंचमी खेळताना नैसर्गिक रंगांचा वापर करून पाण्याचा अपव्यय टाळा अशी माहिती मुलांना दिली. नैसर्गिक रंग लावून शिक्षकांनी मुलांबरोबर होळीचा आनंद लुटला.

**गुढीपाडवा - ५ एप्रिल**

हिंदू कालगणनेप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिप्रदा म्हणजे गुढीपाडवा. या सणाचे महत्त्व, तो कसा साजरा करायचा याबद्दल शिक्षकांनी मुलांना सविस्तर माहिती दिली. या दिवशी गुढी उभारायची तसेच पाटी पूजन (सरस्वती पूजन) करायचे याचे महत्त्व मुलांना सांगितले.

**बनी प्रशिक्षण-प्रशस्तीपत्रक प्रदान - ५ जुलै**

अभ्यासक्रमाबरोबर नर्सरी, ज्यूनियर व सिनियर अशी तीनही वर्ष विद्यार्थीना स्काऊट/गाईडचे बनी प्रशिक्षण दिले जाते. दर बुधवारी मुलांसाठी बनी टमटोलाचे उपक्रम घेतले जातात. हा उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सिनीयर के.जी.च्या विद्यार्थ्यांना प्रशस्ती पत्रक देण्यात येते. यावर्षी सिनीयरच्या ८४ मुलांना ठाणे स्काऊट गाईड मास्तर श्री. केशव चौधरी सर व डीन मॅडम सौ. कोल्हटकर यांच्या हस्ते हे प्रशस्तीपत्रक दिले गेले.

**छंद वर्ग - ८ एप्रिल ते १२ एप्रिल**

दरवर्षी नर्सरी, ज्यूनियर व सिनीयरच्या मुलांसाठी छंद वर्गांचे आयोजन केले जाते. नर्सरीच्या ४५, ज्यूनियरच्या ७५ तर सिनीयरच्या ५७ मुलांनी छंद वर्गाचा लाभ घेतला. सी.डी., पेपर प्लेट, पेपर कप या वस्तूंपासून जोकर, सिंहाचा चेहरा, शुभेच्छा कार्ड, साप अशा वस्तू बनवायला मुलांना शिकवण्यात आले. छंद वर्गाच्या शेवटच्या दिवशी नर्सरीच्या मुलांनी शिक्षकांच्या मदतीने लिंबू सरबत तयार केले. ज्यूनियरच्या मुलांनी ब्रेड, जॅम, बटर व सिनीयरच्या मुलांनी भेळ तयार केली.

दुसऱ्या सत्राचे मुलांचे निरीक्षण घेतले जाते. त्याचा निकाल म्हणजेच प्रगती पुस्तक दि.२० एप्रिल रोजी पालकांना दिले गेले.

याच बरोबर १८-१९ हे शैक्षणिक वर्ष संपले.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०१८-२०१९ चे निकाल :**

| | इ. ६ वी | इ. ९ वी |
|---|---|---|
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी | २३ | १५ |
| प्रात्यक्षिक परीक्षेस पात्र विद्यार्थी | ७ | ३ |

**ब्राह्मण सेवा संघ आयोजित मराठी वक्तृत्व स्पर्धेचा निकाल :**

गट (इ. ८वी ते १०वी) कु. मिहीर आगाशे - द्वितीय क्रमांक

**टिळक विद्यापीठ सायबर परीक्षेचा निकाल : १००%**

| इ. | परीक्षेला बसलेल्या विद्यार्थी | प्रावीण्य प्राप्त विद्यार्थी | प्रथम श्रेणीत उत्तीर्ण | द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण | तृतीय श्रेणीत उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ५ वी | ०६ | ०२ | ०४ | – | – |
| ६ वी | २१ | ०९ | १२ | – | – |
| ७ वी | ३३ | १० | २२ | ०१ | – |
| ८ वी | ०८ | ०२ | ०५ | ०१ | – |
| ९ वी | ०१ | ०१ | – | – | – |

सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :

| इ. | नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | अद्वैत पाश्ते | ९६ |
| ६ वी | धानवी देशमुख | ९६ |
| ७ वी | वैभवी गोरे<br>जय मोहिले | ९८<br>९८ |
| ८ वी | शमिता लोखंडे<br>सोहम निवाते | ९२<br>९२ |
| ९ वी | प्रथम तोलानी | ९६ |

**COE (Cyber Olympiad Exam- 2nd Level) युनिफाईड कॉन्सिल परीक्षा – (राष्ट्रीय स्तरावर) निकाल :**

इ. ६ वी – सार्थक कुलकर्णी – २६६ क्रमांक

**युनिफाईड आंतरराष्ट्रीय इंग्लिश ऑलिंपियाडचा निकाल :**

राष्ट्रीय स्तरावर क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे :

| इ. | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| ६ वी | यश स्वार | १ ला |
| ६ वी | उमा करंदीकर | ५३ वा |
| ८ वी | मृण्मयी गांगल | ६४ वा |

**Junior Maths Olympiad परीक्षेचा निकाल –**

परीक्षेतील प्रात्र खालील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसे देण्यात आली :

| क्र. | विद्यार्थ्यांची नावे | पारितोषिक |
|---|---|---|
| १ | आदित्य खानजोडे | उत्तेजनार्थ |
| २ | अंकुर नाडकर्णी | उत्तेजनार्थ |

**रामायण परीक्षा २०१७ – २०१८ :**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी – ३७

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी – २७

| विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| ३ | ९ | ४ | ११ |

विशेष प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांची नावे –

| विद्यार्थ्याचे नाव | गुण |
|---|---|
| १) महेश्वरी राणे | ८५/१०० |
| २) गौतमी सहस्रबुद्धे | ८५/१०० |
| ३) तनया शिंदे | ८५/१०० |

**क्रीडा**

१) DSO तर्फे घेतलेल्या शोटपूट स्पर्धेत कु. हर्षिका साळुंखे हिने तिसरा क्रमांक पटकावला.

२) आमच्या शाळेच्या क्रिकेट टिमने १२ वर्षीय खालील मुलांच्या गटात सिंघानिया चषक पटकावला :

खेळाडूंची नावे – सोहम कदम, शुभम कुलकर्णी, वेदांत

माणूस स्वतःला जे काही शिकवितो, तेच खरे शिक्षण. – जे. आर. लॉवेल

कदम, सोहम कदम, सर्वेश ठाकूर, आदित्य खोल्लम, आर्यन शितूत, आर्यन हरड, ईशान साठे, नकुल हरड, सोहम पवार, वरद वडालकर आणि अर्जुन खेडेकर.

**एलिमेंटरी व ईंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २०१८ – २०१९ :**

एलिमेंटरी श्रेणी परीक्षा – ९७%

एकूण विद्यार्थी – ८९

उत्तीर्ण विद्यार्थी – ८७

'अ' श्रेणी – १८

'ब' श्रेणी – ३१

'क ' श्रेणी – ३८

ईंटरमिजिएट श्रेणी परीक्षा – ९३%

एकूण विद्यार्थी – ५९

उत्तीर्ण विद्यार्थी – ५५

'अ' श्रेणी – ०५

'ब' श्रेणी – २०

'क' श्रेणी – ३०

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**स्वच्छता अभियान**



महाविद्यालयात दि. १४ मार्च रोजी स्वच्छता अभियान राबवण्यात आले. DLLE, NSS व B-F च्या ७० विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला.

**The Man who Knew Infinity या चित्रपटाचे सादरीकरण**



जोशी बेडेकर कॉलेज फिल्म सोसायटी तर्फे दि. २३ मार्च २०१९ रोजी The Man who Knew Infinity या मॅथ्यू ब्राऊन दिग्दर्शित इंग्रजी चित्रपटाचे सादरीकरण करण्यात आले. थोर भारतीय गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्यावर आधारित असलेल्या या चित्रपटाचे चित्रीकरण केंब्रीज विद्यापीठातील ट्रीनीटी कॉलेज येथे झाले आहे. स्वातंत्र्य पूर्व काळात एक भारतीय आपल्या असामान्य बुद्धिमत्तेवर इंग्लंडच्या गणिती विश्वात नाव कमावतो व गणितातील अनेक अनुत्तरित प्रश्नांना लीलया उत्तरे शोधतो हे या चित्रपटातून पहावयास मिळते. चित्रपटाच्या सादरीकरणानंतर विद्यार्थी व प्राध्यापकांनी चित्रपटातील महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा केली.

कार्यक्रमास युनिफाइड प्लेसमेंट सेलचे संचालक डॉ. शिरीष जोशी, सौ. कविता वालावलकर, प्रा. प्रशांत धर्माधिकारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

### जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या इंग्रजी व तत्त्वज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांची अमेरिकन ग्रंथालयाला शैक्षणिक भेट



जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या इंग्रजी व तत्त्वज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ७ मार्च रोजी वांद्रे कुर्ला संकुलातील अमेरिकेच्या दूतावासातील ग्रंथालयास शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीत पदवी आणि पदव्युत्तर पातळीवरील ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या भेटीत त्यांनी अमेरिकन जीवनशैली, इंग्रजी भाषा आणि साहित्य, संस्कृती, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र अशा विविध विषयांवरील दर्जेदार ग्रंथ, मासिके, नियतकालिकांचा परिचय करून घेतला. पाच तासांच्या या भेटीत या ग्रंथालयातील वातावरण, पुरविण्यात आलेल्या उत्तम सुविधा, आणि उपलब्ध दर्जेदार ज्ञानाचे स्रोत पाहून विद्यार्थी खूप प्रभावित झाले. या दरम्यान अमेरिकन नाटककार आर्थर मिलरच्या नाटकावर आधारित एक चित्रपट 'अ डेथ ऑफ अ सेल्समन' दाखविण्यात आला त्यानंतर या चित्रपटावर चर्चाही करण्यात आली. अमेरिकन दूतावासाचे सहाय्यक सांस्कृतिक अधिकारी डॉ. जोनाथन हॉंग यांनी या चित्रपटावर भाष्य केले. तसेच मूळ नाटकावर विस्तृत चर्चा केली. त्यांनी विद्यार्थ्यांशीही संवाद साधला व त्यांच्या साहित्य, आंतरराष्ट्रीय घडामोडी, इतिहास आणि राजकीय विषयाशी संबंधित विविध प्रश्नांवर समाधानकारक उत्तरे दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील पुस्तके, मासिके, दृक श्राव्य ग्रंथालयांची, तसेच ग्रंथालयाने उपलब्ध करून दिलेल्या इतर वैशिष्ट्यपूर्ण सेवा, आणि मल्टिमिडिया सुविधांची ओळख करून घेतली. इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. प्रमोद खराटे यांनी या भेटीचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल ग्रंथालय प्रशासनाचे यावेळी आभार मानले. या ग्रंथालयाला भेट देता आली यामुळे विद्यार्थी खूप आनंदित झाले होते. या भेटीमुळे एका नवीन वातावरणाशी व आगळ्या-वेगळ्या अनुभवाशी परिचय झाला आणि त्यामुळे दोन संस्कृतींमध्ये दुवा निर्माण होण्यास मदत झाली.

इंग्रजी भाषा विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खराटे, तसेच डॉ. सुचित्रा नाईक मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली ही शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. यावेळी प्रा. डॉ. सुजा रॉय अब्राहम आणि प्रा. प्रफुल्ल भोसले यांनी या वैशिष्ट्यपूर्ण भेटीच्या आयोजनासाठी सहकार्य केले.

### स्टाफ अ‍ॅकॅडमी



दिनांक २२/०४/२०१९, मंगळवार रोजी स्टाफ अ‍ॅकॅडमी तर्फे काव्य वाचनाचा व २०१७-१८, २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात ज्या प्राध्यापकांना Ph.D प्राप्त झाली त्यांचा सत्कार सोहळा देखील संपन्न झाला. याप्रसंगी प्रा. प्रकाश जंगले, डॉ. विमुक्ता राजे यांनी स्वरचित काव्य सादर केले. तसेच ०९ Ph.D प्राप्त प्राध्यापकांचा प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मान्यवर कवी प्रा. प्रकाश

जंगले, डॉ. विमुक्ता राजे यांचा देखील प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात उपप्राचार्य सुभाष शिंदे, उपप्राचार्या मोनिका देशपांडे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संगीता दीक्षित, समन्वयक श्री. शर्मा सर, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, विना-अनुदानीत विभागाचे सर्व समन्वयक तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक कार्यक्रमास हजर होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. खरे तर प्राचार्यां कडूनच या कार्यक्रमाची संकल्पना सुचविली गेली. त्याकरिता अनेकानेक धन्यवाद.

समितीच्या सर्व सभासदांनी उत्तम सहकार्य केले.

स्टाफ अकॅडमी सर्वाचीच ऋणी आहे. धन्यवाद.

सत्कार करण्यात आलेले डॉक्टर्स

१. डॉ. विनोद चांद्वानी
२. डॉ. महेश पाटील
३. डॉ. शेफाली कोंडेवार
४. डॉ. मृण्मयी थत्ते
५. डॉ. नीलम शेख
६. डॉ. संगीता दास
७. डॉ. विमुक्ता राजे
८. डॉ. अर्चना प्रभुदेसाई
९. डॉ. प्रशांत धर्माधिकारी

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### पुलवामामधील अमर जवानांना बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाची महारक्तदानाने मानवंदना

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयांतील राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना या युवाशक्तीने पुलवामा येथे दहशतवादी संघटनेच्या भ्याड हल्यात धारातीर्थी पडलेल्या शहीद जवानांना मानवंदना म्हणून व महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आणि विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या १०२ व्या जयंतीसाठी अभिवादन म्हणून नायर हॉस्पिटल मुंबई व लायन्स क्लब ऑफ कांजूर विक्रोळी मिलेनिअम यांच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या जिमखान्यामध्ये एका महारक्तदान शिबिराचे आयोजन केले यामध्ये १३९ व वर्षभरात ६७१ रक्तसंकलन झाले. एका शैक्षणिक वर्षात व नायर रुग्णालय, केईएम रुग्णालय व ठाणे सिव्हील रुग्णालय या तिन्ही रक्तपेढ्यांच्या सहकार्याने वर्षभरात एकूण ६७१ इतके विक्रमी रक्तसंकलन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या एकत्रित प्रयत्नाने इतक्या मोठ्या प्रमाणावर रक्तसंकलन होण्याची पहिलीच वेळ आहे. या भावपूर्ण आदरांजलीसाठी रक्तदात्यांनी आपले रक्तदान करून वेगळा धडा गिरवला आहे.

### मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त डॉ. विजया वाड यांच्या हस्ते बांदोडकरच्या 'संयुजा' वार्षिकांकाचा प्रकाशन प्रकाशनसोहळा

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात वार्षिकांक समिती, ग्रंथालय विभाग व मराठी भाषा आणि वाङ्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने एका त्रिवेणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या माजी अध्यक्षा व अखिल भारतीय कुमार साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा डॉ. विजया वाड ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

हे वर्ष बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे व ग. दि. माडगुळकर, राम

गणेश गडकरी व पु. ल. देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. हा दुग्धशर्करा योग आल्यामुळे भाषा, ग्रंथ, साहित्य व लेखन या विविध कौशल्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणून डॉ. विजया वाड यांना 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून व 'संयुजा' या महाविद्यालयाच्या वार्षिकांकाचे प्रकाशन करण्यासाठी विशेष आमंत्रित केले होते.

याप्रसंगी, महाविद्यालयीन, विज्ञानाच्या विद्यार्थ्यानी भितीपत्रके, म्हणी, सुविचार, वाक्प्रचार, सुभाषिते यांचा समावेश असलेली भितीचित्रे व भितीपत्रके हस्तलिखिते, रांगोळी, एकपात्री अभिनय, काव्यवाचन व भाषणे विविध स्तरांमधील विद्यार्थ्यांनी सादर केली. कार्यक्रमातील सरस्वती स्तवन ते शेवटी पसायदान ही सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांनी बिनचूक पार पाडली. यावेळी अक्षदा हिने 'ती फुलराणी' मधील एकपात्री अभिनय तसेच धनश्री पवार हिने 'मोगरा फुलला' हे गीत व प्रमोद जाधव याने कणा नावाच्या कवितेचे प्रकट वाचन केले.

तसेच यावेळी प्रमुख पाहुण्या डॉ. विजया वाड यांचे पुस्तकरूपी भेट देऊन स्वागत करण्यात आले व संयुजा या वार्षिकांकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. प्रा. गोखे मॅडमनी संपादकीय मनोगत व्यक्त केले व या सुवर्णमहोत्सवी वर्षातील या संयुजाची संपादनाची कथा आपल्या अनोख्या शैलीत सादर केली.

महाविद्यालयाच्या प्राचार्या व मुंबई विद्यापीठाच्या माजी पहिल्या महिला अधीक्षिका डॉ. माधुरी पेजावर यांनी मराठी भाषेतील 'शीर, सूर, ताल' इत्यादी शब्दांची गंमत आपल्या खुमासदार शैलीत व एकही इंग्रजी शब्दाचा वापर न करता सादर केली.

आपला चेहरा हा आपले प्राक्तन कधीच असत नाही, आपल्या आईवडिलांसाठी, देशासाठी आपण तत्पर राहिले पाहिजे, आपल्या मूलभूत भावना ह्या काही अलंकारिक भाषेत निर्माण होत नाहीत, इत्यादी संदेश देऊन त्यांनी तरुणाईचे विशेष कौतुक केले व सर्वांना महाविद्यालयालाही मराठी भाषा दिनानिमित्त उत्स्फूर्तपणे काव्यपंक्तीमधून शुभेच्छा दिल्या.

ग्रंथालय विभागातर्फे गेल्या ५० वर्षांतील संयुजाचे अंक प्रदर्शित करण्यात आले होते व त्यामुळे जुन्या स्मृतींना उजाळा मिळाला असे मत ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी व्यक्त केले.

या बहारदार व भाषिक सृजन सोहळ्याची सांगता पसायदानाने झाली.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात 'सृजन' महोत्सवाचे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष. यानिमित्ताने मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्फे विविध स्पर्धांचे आयोजन म्हणून 'सृजन' या आंतरमहाविद्यालयीन महोत्सवाचे आकर्षण म्हणून 'फिरता चषका' चे आव्हान योजण्यात आले. यामध्ये वकृत्व, निबंध, काव्यवाचन, वादविवाद, पत्रलेखन, कवितालेखन व प्रश्नमंजुषा अशा सप्तरंगी कलांचे 'सृजन' करण्यात आले व जास्तीत जास्त सहभाग व सर्व स्पर्धांत उत्कृष्ट ठरणाऱ्या महाविद्यालयाला फिरता चषक बहाल करण्यात आला.

यामध्ये सकाळी ९ ते संध्याकाळी ४ या वेळेत पतंजली सभागृह, योगकेंद्र व ग्रंथालय या विविध ठिकाणी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांचे परीक्षण स्वानंद गांगल (वक्ता दशसहस्रेषु व नी. गो. पंडितराव विजेते), पंकज चव्हाण (नामवंत वक्ता व महाराष्ट्राचा वक्ता कोण? या स्पर्धेतील विजेता व जिल्हा परिषदेमध्ये जनसंपर्क अधिकारी) तसेच रोटरी क्लब ऑफ ठाणे या संस्थेच्या सौ. आरती कुलकर्णी (कवयित्री) यांनी केले.

या संपूर्ण सृजनच्या महोत्सवात ५५ महाविद्यालयांनी

भाग घेतला व जोशी बेडेकर महाविद्यालयाचा उत्कृष्ट सहभागासाठी महासुवर्णपदक बहाल करण्यात आले व सृजनचा सर्वोत्कृष्टतेचा मानाचा आंतरमहाविद्यालयीन फिरता करंडक वझे केळकर महाविद्यालयाने पटकाविला. याप्रसंगी अध्यक्षा म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर व प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेतील मुख्यलेखाधिकारी व वर्गाचे अधिकारी मयुर हिंगाणे हे उपस्थित होते. तसेच रोटरी क्लब ऑफ ठाणेचे अध्यक्ष आजीन केळकर हे विशेष अतिथी म्हणून हजर होते.

मराठी वाङ्मय मंडळाचे समन्वयक प्रा.बिपीन धुमाळे यांनी सर्व सहभागी महाविद्यालये, विद्यार्थी प्रतिनिधी, स्वयंसेवक तसेच या स्पर्धेला मदत करणारे रोटरी क्लब, FACT, IAS , प्रा. मुग्धा केसकर या सर्वांचे प्रायोजक म्हणून विशेष आभार व्यक्त केले.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय Milestone Merits Leadership Award ने सन्मानित**




२०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे.

रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालिटी ॲवार्ड ट्रस्ट तर्फे या संस्थेतर्फे नुकताच Milestone Merits Applied Award in Leadership Category हा पुरस्कार विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला.

रामकृष्ण बजाज ही संस्था दर्जेदार कामाचे कौतुक करणारी अत्युच्च संस्था मानली जाते. एवढ्या मान्यताप्राप्त संस्थेकडून उत्कृष्ट नेतृत्वाकरता मिळालेला हा पुरस्कार म्हणजे महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांना, शिक्षकांना, उपक्रमांना, ग्रंथालयाला, प्रशासनाला आणि सोयीसुविधांना मिळालेली कौतुकाची पावतीच आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी बदलत्या काळाची पाऊले ओळखून विविध विषयांची सुरुवात केली. या महाविद्यालयात पदवी स्तरावर एकूण १३ विषय शिकविले जातात. या व्यतिरिक्त ०५ विषयांमध्ये म्हणजे रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, पर्यावरणशास्त्र, जैवविविधता, व वन्य जीव संवर्धन आणि माहिती तंत्रज्ञान या विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणाची एम.एस.सी. तर ०५ विषयांमध्ये म्हणजे रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र व पर्यावरणशास्त्र या विषयांमध्ये एम. एस. सी. संशोधनाची व पी.एच.डी.चीही सोय आहे. महाविद्यालयातील १३ शिक्षकांना संशोधना करिता मार्गदर्शक म्हणून विद्यापीठाची मान्यता आहे. गेल्या पाच वर्षात २०० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय जर्नलमधून सादर झाले आहे.

गेल्या ५० वर्षाच्या कालावधीत महाविद्यालयाला विविध पुरस्कार जाहीर झाले; जसे मुंबई विद्यापीठाचा २००९-१० मधील उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, जागर जाणिवांचा प्रथम व द्वितीय पारितोषिक, नॅक या संस्थेकडून दोन वेळा 'अ' श्रेणी बहाल, डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी या केंद्र सरकारच्या विभागातर्फे

पुष्कळ वेळा अबोल नजरही बोलकी असते. - ओव्हिड

स्टार कॉलेज स्कीमकरता महाविद्यालयाची निवड, FIST तर्फे एक करोड रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. केंद्र सरकारतर्फे Centre of Potential Excellence करता महाविद्यालयाची निवड झाली आहे.

२०१४ साली आय.एम.सी. रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालिटी ॲवार्ड ट्रस्ट तर्फे महाविद्यालयाला Quality क्षेत्रातील Commendation Certificate प्राप्त झाले. सुवर्णमहोत्सवी वर्षात हा IMC तर्फेचा पुरस्काराने सन्मानित होणे हा दुग्धशर्करा योगच आहे व महाविद्यालयाकरता अतिशय अभिमानाची बाब आहे.

महाविद्यालयाच्या या यशात सर्वच आजी व माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सहकारी, यांचा सहभाग आहे. विद्या प्रसारक मंडळाकडून मिळणारे प्रोत्साहन व पाठिंबा यामुळेच नवनवीन उपक्रम राबवणे सोपे जाते. महाविद्यालयाच्या प्राचार्य यांचे अभ्यासपूर्ण निरीक्षण व मार्गदर्शन आणि सर्वच आजी व माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सहकारी यांचे सहकार्य यामुळेच हे यश प्राप्त झाले आहे.

## विद्या प्रसारक मंडळाचे<br>ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

• CDC ची बैठक दिनांक २ फेब्रुवारी २०१९ रोजी घेण्यात आली.

• महाविद्यालयाच्या मार्फत विद्यापीठाने पहिल्या सत्राची परीक्षा दिनांक १, ४, ६ व ८ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली.

• द्वितीय व तृतीय विधीचे वर्ग दिनांक १८ जानेवारीपासून सुरू करण्यात आले. तसेच प्रथम विधी महाविद्यालयाचे वर्ग ११ फेब्रुवारीपासून सुरू करण्यात आले.

• महाविद्यालयाने दिनांक २० फेब्रुवारी रोजी डॉ. व्ही. एन. बेडेकर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी एकूण ७ महाविद्यालयाने भाग घेतला होता. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून ॲड. अभिजीत सावंत व निलाक्षी सागवेकर हे होते. स्पर्धेमध्ये खालीलप्रमाणे बक्षिसे देण्यात आली.

१) प्रवीण गांधी, कॉलेज ऑफ लॉ, विलेपार्ले – प्रथम पारितोषिक

२) जितेंद्र चव्हाण, कॉलेज ऑफ लॉ, विलेपार्ले – द्वितीय पारितोषिक

श्री. मधुसुदन शेट्टी – उत्कृष्ट वक्ता प्रथम पारितोषिक

मिस. मधुली कानगो – उत्कृष्ट वक्ता प्रथम पारितोषिक

श्री. विनय नायर – उत्कृष्ट वक्ता उत्तेजनार्थ पारितोषिक

• महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यासाठी फेब्रुवारी महिन्यात इंग्रजी स्पीकींगचे वर्ग आयोजित करण्यात आले होते. प्रा. प्रीती गोपूनायर यांना यासाठी नेमण्यात आले होते. एकूण १० विद्यार्थ्यांनी यासाठी प्रवेश नोंदविला.

• प्रा. विनोद एच. वाघ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे 'लिंग जागरुकता' या विषयावरील रीफ्रेशर्स कोर्समध्ये भाग घेऊन पूर्ण केला.

• महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यासाठी सकाळच्या सत्रात डॉ. बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली विधी पदवी धारकासाठी पदवी प्रदान समारोह आयोजित करण्यात आला होता. तसेच दुपारच्या सत्रात पदवी प्रदान समारोह महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या हस्ते करण्यात आला. हा कार्यक्रम दि. ११ फेब्रुवारी रोजी पार पडला.

• **सर्वोच्च न्यायालय भेट**

**दिल्ली शैक्षणिक भेटीचा अहवाल**

व्ही. पी. एम. टीएसी लॉ कॉलेजने २ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०१९ दरम्यान दिल्लीत आयोजित

शैक्षणिक भेटी केल्या.

द्वितीय आणि तृतीय वर्ष एलएलबीचे ४० विद्यार्थी या शैक्षणिक फेऱ्यासाठी गेले आणि त्यांच्याबरोबर तीन शिक्षक, प्रोफेसर रुपाली यरेनासेस, प्रा. यतीन पंडित आणि प्रा. सुखराम बिसेन यांच्यासह होते.

या ट्रिपमध्ये भारतातील माननीय सर्वोच्च न्यायालयास भेट देण्यात आली. जिथे विद्यार्थ्यांनी कार्यवाही केली. सुप्रीम कोटोच्या रेकॉर्डवर वकील स्नेहाशिष मुखर्जी यांनी विद्यार्थ्यांशी सुप्रीम कोर्टाच्या प्रक्रियेची व्याख्या केली. भारतीय संसदेचे दौरे विद्यार्थ्यांसाठी, संसदेच्या कामकामाजासंबंधी असलेल्या संसदेच्या संचालक मंडळाचे संचालक होते. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि दिल्ली न्यायिक अकादमीला भेट देण्याचा आणखी एक चांगला अनुभव होता. संचालक आणि इतर अधिकारी आमच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधलेले प्रतिष्ठित संस्था आहेत. या शैक्षणिक भेटी व्यतिरिक्त या दौऱ्यात काही ऐतिहासिक महत्त्वाच्या जागांवर देखील भेट देण्यात आली.

राष्ट्रपती भवन, इंडिया गेट, कुतुब मिनार, इंदिरा गांधी मेमोरियल, राजघाट, लाल किल्ला, दिल्ली आणि जालियानवाला बाग, अटारी (बाघा) सीमा आणि अमृतसर पंजाब येथील सुवर्ण मंदिर.

**प्रात्यक्षिक परीक्षा**

दिनांक १ मार्च २०१९ रोजी खालील प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आल्या.

प्रथम विधी : भारतीय अधिवक्ता व कायदा व न्यायालयाचा अवमान कायदा.

द्वितीय विधी : जनहित याचिका, वाटाघाटी, अशील समुपदेशन

तृतीय विधी : मसुदा लेखन

• दिनांक २ मार्च २०१९ रोजी सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रात्यक्षिक प्रोजेक्ट दाखल केले. यामध्ये न्यायालय भेट, न्यायनिर्णय स्पष्टीकरण, अधिवक्ता कार्यालय भेट इत्यादींचा समावेश होता.

दिनांक ५,६ आणि ७ मार्च २०१९ रोजी तृतीय विधीच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिरूप न्यायालय परीक्षा घेण्यात आली.

द्वितीय विधी विद्यार्थ्याची अशिल समुपदेशन परीक्षा जानेवारी (२१ ते ३०) २०१९ मध्ये घेण्यात आली.

प्रथम विधी विद्यार्थ्यांची 'समुह चर्चा' परीक्षा १८ मार्च ते २२ मार्च या दरम्यान घेण्यात आली.

तृतीय विधी विद्यार्थ्यांचा व्हॉयवा (तोंडी परीक्षा) दिनांक १८ व २५ मार्च रोजी घेण्यात आला व या सर्व परीक्षांचा निकाल दिनांक २६ व २७ मार्च रोजी घोषीत करण्यात आला.

**मराठी दिवस**

दिनांक २ मार्च २०१८ रोजी महाविद्यालयामध्ये मराठी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी जोशी बेडेकर महाविद्यालयाचे प्रा. धर्माधिकारी यांनी 'आमच्या मराठी भाषेची समृद्धी' या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी विद्यार्थ्यानी प्रभारी प्राचार्या श्रीमती डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांना पीएचडी पदवी मिळाली म्हणून सन्मान केला. तसेच या दिवशी विद्यार्थ्यांनी कविता वाचन तसेच भाषण करून मराठी दिवस उत्साहात साजरा केला.

**महिला दिवस**

महाविद्यालयाच्या 'मोफत विधी सेवा केंद्र' च्या माध्यमातून महिला दिवस साजरा करण्यात आला. दिनांक ८ मार्च २०१४९ रोजी Power Point Presentation च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी महिला विषयक कायद्यावर माहिती दिली.

कु. वेदिका पावसकर : महिलांवरील लैंगिक अत्याचार

कु. पलक गुप्ता : महिलांविषयक कामगार कायदे

कु. निलावती होलमुखे : संपत्तीवरील महिलांचा अधिकार

कु. रिटा उतेकर : घरगुती हिंसाचार कायदा.

**IQAC**

दिनांक ६ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयाने IQAC बैठकीचे आयोजन केले होते. यामध्ये अधिवक्ता श्री. चव्हाण तसेच प्र. प्राचार्या, प्राध्यापक, कर्मचारी व नियुक्त विद्यार्थी हजर होते.

**File Your PIL स्पर्धा**

महाविद्यालयाने दिनांक ९ मार्च २०१९ रोजी घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना बॉम्बे उच्च न्यायालयाच्या नियमाप्रमाणे मसुदा लेखन करणे व ते सादर करणे असते. 'भारतातील सार्वजनिक निवडणूक' हा सदर स्पर्धेचा विषय होता. या स्पर्धेसाठी वरीष्ठ अधिवक्ता राम आपटे व सायबर विशेषतज्ज्ञ प्रशांत माळी परीक्षक म्हणून होते. या स्पर्धेमध्ये खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात आली.

**परीक्षेचा निकाल**

महाविद्यालयाने विद्यापीठाच्या सूचनेप्रमाणे खालील परीक्षेचे निकाल जाहीर केले.

सत्र पहिले : १४ मार्च २०१९

सत्र दुसरे : १४ फेब्रुवारी २०१९

सत्र तिसरे : ९ मार्च २०१९

सत्र चौथे : १४ फेब्रुवारी २०१९

**अँटी रॅगिंग कायद्यावर व्याख्यान**

दिनांक २७ मार्च २०१९ रोजी जिल्हा विधी सेवा प्रधिकरण केंद्र, ठाणे व महाविद्यालयाचे मोफत विधी सेवा केंद्र यांच्या माध्यमातून 'अँटी रॅगिंग कायदा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. चे सचिव श्री एम. एन. देशपांडे अधिवक्ता नलगे यांनी या विषयावर व्याख्यान दिले. तसेच महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सदर विषयावर खूप आकर्षक असे नाट्य सादर केले.

**निवडणूक कर्तव्यासाठी नेमणूक**

महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर वर्गातून खालीलप्रमाणे ठाणे १४८ मतदार संघासाठी निवडणुकी कार्यासाठी नेमणूक करण्यात आली.

१) सहा. प्राध्यापक – विनोद एच. वाघ

२) ग्रंथपाल श्रीमती शीतल औताडे

३) वरीष्ठ लिपिक रंजन करंदीकर

४) कनिष्ठ लिपीक मुकेश राणे

५) शिपाई राकेश पाथरे

६) संतोष सुगरे

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत मिळवलेली बक्षीसे

| महाविद्यालयाचे नाव | स्पर्धेचे नाव | स्पर्धक | बक्षीस |
|---|---|---|---|
| जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, मुंबई | राष्ट्रीय अभिरूप न्यायालईन स्पर्धा | प्रतीक तुंगरे<br>मधुसुदन शेट्टी<br>कु. श्रीलक्ष्मी | विजेते |

| | | | |
|---|---|---|---|
| | न्यायनिर्णय लिखाण स्पर्धा | बालाजी एन.<br>कु. स्टेफी अल्वा | विजेते |
| | मुख्य न्यायधीशास पत्र | अभिषेक हेगडे<br>मधुसुदन शेट्टी | विजेते |
| व्ही.ई.एस. विधी महाविद्यालय | बॉलीवुड अभिरूप न्यायरुप स्पर्धा | अक्षत शेरावत<br>कु. प्रज्ञा सानस<br>कु. निकीता मोरे<br>कु. स्टेफी अल्वा | विजेते |
| के. सी. विधी महाविद्यालय, मुंबई | मुख्य न्यायधीशास पत्र लेखन स्पर्धा | कु. रिटा उतेकर<br>कु. नीती पिल्लई | विजेते |
| नारी गुरसहाणी विधी महाविद्यालय, उल्हासनगर | राज्यस्तरीय अभिरूप न्यायालय स्पर्धा | कु. नरती पिल्लई<br>कु. फातिमा मार्कतेय | उत्कृष्ट अधिवक्ता |
| के. एल. ई. विधी महाविद्यालय | राष्ट्रीय वादविवाद स्पर्धा | मधुसुदन शेट्टी<br>बालाजी एन. | उपविजेते |

या व्यतीरिक्त विद्यार्थ्यांनी अनुराग स्पर्धा, न्यू विधी महाविद्यालय आणि गव्हर्नमेंट विधी महाविद्यालय यांची कर अभिरूप न्यायालय स्पर्धामध्ये भाग घेतला.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**'Innovision' या वार्षिकाचे प्रकाशन आणि पारितोषिक वितरण सोहळा.**

वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे या तांत्रिक शिक्षण संस्थेतर्फे 'Innovision' या वार्षिकाचे प्रकाशन दि. २२ मार्च २०१९ रोजी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत तंत्रनिकेतनच्या ए.व्ही. रुममध्ये पार पाडले.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे डॉ. गणेचारी शंकरय्या महारुद्राय्या (प्राचार्या, ठाकूर पॉलिटेक्निक कांदिवली, मुंबई) हे उपस्थित होते.

प्रथम वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनाचे प्राचार्य डॉ. दि. कृ. नायक यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले आणि आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते वार्षिकांचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. शिवाय संस्था करीत असलेल्या प्रगतीसंबंधी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमा दरम्यान प्रमुख पाहुण्यांच्या शुभ हस्ते विद्यार्थ्यांना विविध पारितोषकांचे वितरण करण्यात आले.

**तंत्रनिकेतनचे श्री. अजय सुतवाणी सेवानिवृत्त**



विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे मधील श्री. अजय सुतवणी दि.३१ मार्च २०१९ रोजी सेवानिवृत्त झाले. श्री. सुतवणी हे तंत्रनिकेतनमधे १ जानेवारी १९८५ मध्ये सेवेत

चतुर्थ कर्मचारी म्हणून रुजू झाले होते. ते आता प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून आपल्या प्रदीर्घ सेवे नंतर सेवानिवृत्त झाले.

दि.२९ मार्च २०१९ या दिवशी सेवानिवृत्तनिमित्ताने श्री. सुतवणी यांचा अशासकीय शिक्षकेतर कर्मचारी युनीयन–तंत्रानिकेतन युनिटतर्फे त्यांना शाल श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन युनियनचे ज्येष्ठ सदस्य श्री. हरिभाऊ दंडवते यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

तंत्रानिकेतन तर्फे प्रा. तुषार मोहिते पाटील यांचे हस्ते भेटवस्तू शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रसंगी मोहिते पाटील सरांनी श्री.अजय सुतवणी यांच्या विषयीचे मनोगत व्यक्त केले.

सर्वच उपस्थितानी त्यांचे पुढील आयुष्य आरोग्यपूर्ण आणि भरभराटीचे जावो अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**मार्च २०१९ मधील कार्यक्रम / वार्ता**

२, ५ आणि १२ मार्च : प्रा. कृणाल के. पुंजानी, प्रा. दीप्ती पेरीवाल आणि श्री. अमित नंबियार यांनी डॉ. व्ही.एन. बेडेकर इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (ब्रीम्स ) तर्फे युथ एक्सलन्स समिट २०१९ चे आयोजन केले आणि या संमेलनात मुंबईतील १५ महाविद्यालयातील २९० विद्यार्थी सहभागी झाले.



२, ५ आणि १२ मार्च : प्रा. संदीप यांनी युथ एक्सलन्स समिट २०१९ मध्ये ऍडव्हान्स एक्सेल या विषयाची कार्यशाळा आयोजित केली.



५ –९ मार्च : ब्रीम्सचे विद्यार्थी तसेच प्रा. शेखर, प्रा. सुषमा आणि श्री.अभिजीत ग्रामीण निमंत्रण कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील वेळणेश्वर येथे गेले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील आर्थिक घटक समजण्यास आणि विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण जीवनशैली बद्दल संवेदनशीलता विकसित करण्यास मदत झाली.



७ मार्च: ब्रीम्सच्या कर्मचारी वर्गासाठी शैक्षणिक क्षेत्रातील सेवा गुणवत्ता विषयावर श्री. जॉनसन जॉर्ज याचे अतिथी व्याख्यान आयोजित केले गेले.

प्रा. महेश भानुशाली यांच्या सहकार्याने ब्रीम्स तर्फे मेसर्स निधी ब्रोकिंग सर्व्हिसेस प्रा. लि. बरोबर करार करण्यात आला व ब्रीम्सच्या शिक्षक व शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांसाठी मेसर्स निधी ब्रोकिंग सर्व्हिसेस प्रा.लि.चे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश शाही यांचे 'गुंतवणूक उत्पादने आणि स्मार्ट गुंतवणूक' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

८ मार्च: अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि संचालक डॉ. नीतिन जोशी यांनी वि प्र. म. ठाणे यांच्या वतीने फिलीपिन्स च्या असम्प्शन विद्यापीठा बरोबर झालेल्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

डॉ. स्मिता जपे यांनी प्रथम वर्षाच्या एमएमएस आणि पीजीडीएमच्या मुलींसाठी प्रॉक्टर अँड गॅंबल कंपनी तर्फे स्वास्थ्य आणि सौंदर्यप्रसाधने या विषयावरील एका सत्राचे आयोजन केले.



डॉ. पल्लवी आणि डॉ. मीनाक्षी यांनी ब्रीम्समधील मार्च महिन्यातील वाढदिवस समारंभाचे व आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले.



डॉ. सुखदा तांबे यांना इंडियन मर्चन्ट चेम्बर रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालीटी अवॉर्ड IMC-RBNQA Awards Cycle 2018 साठी परीक्षक सदस्य म्हणून नेमण्यात आले होते.




१५ मार्च: डॉ. पल्लवी यांनी आरबीएनक्यूए द्वारे आयएमसी चर्चगेट येथे आयोजित आयएमसी एमक्यूएच बेस्ट प्रॅक्टिस स्पर्धेमध्ये सादरीकरण केले.




२० मार्च: एमएमएस द्वितीय सत्राच्या विद्यार्थीनी कु. श्रुती अहिरे आणि कु. श्रुती कामात यांनी डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांच्या मार्गदर्शनाखाली डिमॉनिटायझशन अँड इट्स इम्पॅक्ट ऑन इंडियन इकॉनॉमि (नोटबंदी आणि त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रभाव) या विषयावर लेख सादर केला. हा लेख यूजीसी मान्यताप्राप्त नियतकालिक ॲडव्हान्स ॲन्ड इनोवेटिव्ह रिसर्च ऑफ इंटरनॅशनल जर्नल मध्ये प्रकाशित झाला.



२२ मार्च: इंडो ग्लोबल एसएमई चेम्बरने स्थापन केलेल्या प्रतिष्ठित पुरस्कार विमेन इन बिझिनेस अवॉर्ड्स २०१९ साठी डॉ. स्मिता जपे यांना जूरी पॅनल (निवड समिती) सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले.



२२ मार्च: - ब्रीम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी यांनी, पीजीडीएमच्या विद्यार्थ्यांसाठी एका विशेष सत्राचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी स्वत:साठी एक दृष्टी विकसित करणे, लक्ष्य निर्धारित करणे की जेणे करून ते वेगळा विचार कसे करू शकतात या बद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



२९ मार्च: डॉ. सुखदा यांनी महाचर्चा : महात्मा गांधी यांचे जीवन आणि कार्यामधून व्यवस्थापनाचे धडे या कार्यक्रमाचे आयोजन केले.



प्रा. दीप्ती यांचा 'अ क्रिटिकल स्टडी ऑफ द परफॉर्मन्स ऑफ प्राइव्हेट इंडियन बँक्स पोस्ट इनिशिअल पब्लिक ऑफरिंग' हा शोध निबंध यूजीसी मान्यता प्राप्त जर्नल ऑफ इंटरनॅशनल जर्नल ऑफ ॲडव्हान्स अँड इनोवेटिव्ह रिसर्चमध्ये प्रकाशित झाला.


•••

**दिशा संपर्क दूरध्वनी**

**०२२-२५४२ ६२७०**

माणसाचा मोठेपणा त्याच्या शत्रूवरून आजमाविता येतो! - डॉन प्याट

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)



**Tapestry**


इ.स.१५४८ साली प्रोटेस्टंट ख्रिश्चन पंथियांनी नॉत्र दामवर हल्ला चढवला व तेथील अनेक पुतळे नष्ट केले. त्यांच्या दृष्टीने चर्चमध्ये मूर्ती पूजा करणे योग्य नव्हते. अनेक वेळेला नॉत्र दाम मधील राजांच्या पुतळ्यांना नष्ट करण्यात आले. फ्रान्समधील राज्ससत्ता व धर्मसत्तेच्या विरोधात पेटून उठलेल्या अनेक जमावांनी वेळोवेळी नॉत्र दामला लक्ष्य केले.

१७८९ सालच्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या धामधुमीत नॉत्र दामला लक्ष्य करण्यात आले. येथील व्हर्जिन मेरीची उपासना थांबवून तिच्या जागी Goddess of Liberty ची स्थापना करण्यात आली. Liberty, Equality व Fraternity हे अर्थात स्वातंत्र्य, समता व बंधुता हे परवलीचे शब्द झाले आणि अनिर्बंध राज्यसत्तेचे उच्चाटन झाले. निधर्मी व लोकशाहीवादी राज्याची सुरुवात होण्यासाठी शंखध्वनी करण्यात आला तो याच वास्तूच्या साक्षीने.

१७९१ साली नॉत्र दाममध्ये बसवलेल्या महाकाय घंटा अक्षरशः वितळवण्यात आल्या आणि २८ राजांचे पुतळे दंगेखोरांनी उद्ध्वस्त केले.

इ.स. १८०२ मध्ये नेपोलियन बोनापार्ट या जगप्रसिद्ध राजाने व्हॅटिकनशी तह करून नॉत्र दामला कॅथलिक चर्चच्या आधिपत्याखाली आणलं. याचवर्षी नेपोलियनचा राज्याभिषेक 'नॉत्र दाम' मध्ये व्हॅटिकनच्या प्रतिनिधिच्या हस्ते झाला. मात्र, नॉत्रदामच्या वास्तूकडे म्हणावे तेवढं लक्ष दिलं जात नव्हतं.

नॉत्र दामचा सुवर्णकाळ आणण्यासाठी मोलाचं काम करणारा फ्रेंच कादंबरीकार व्हिक्टर ह्यूगो याने सर्व प्रथम या वास्तूचे महत्त्व जनसामान्यांना सांगावयास सुरुवात केली. यासाठी त्याने १८२५ साली 'On the Destruction of Monuments of France' हा लेख लिहिला. व्हिक्टर ह्यूगोने १८३१ साली The Hunchback of Notre-Dame नावाची 'गोथिक फिक्शन' या प्रकारात मोडणारी कादंबरी लिहिली. या कादंबरीच्या लाखो प्रती हातोहात खपल्या व 'नॉत्र दाम' चर्चच्या पुनर्बांधणीबाबत जनमत तयार होऊ लागलं. एखाद्या कादंबरीमुळे ऐतिहासिक वास्तूच्या पुनर्बांधणीचा राष्ट्रीय प्रकल्प हाती घ्यावा असं जनतेला वाटण्याचा हा बहुधा पहिलाच प्रयत्न.




The Hunchback of Notre Dame या कादंबरीत व्हिक्टर ह्यूगोने 'इस्नेराल्डा' या सुंदर मुलीच्या भोवती तिच्या सौंदर्यावर भाळलेल्या क्वासीमोडो, कॅप्टन फोबस,

पीयर गींगोए व फ्रोलो या पात्रांची रचना केली. यातील क्वाझीमोडो हा कुबड आलेला असा विद्रूप चितारला आहे. कादंबरीच्या शीर्षकातील Hunchback (कुबड्या) हाच. नॉत्र दाम चर्चमधील काही टन वजन असणारी महाकाय घंटा वाजवण्यासाठी क्वाझीमोडोची नियुक्ती होते. (Renaissance) प्रबोधन युगात नॉत्र दामच्या स्थापत्यशास्त्रात होत असलेल्या बदलांवर व्हिक्टर ह्यूगोने विस्ताराने लिहिले आहे. एकूणच नॉत्र दामच्या ऐतिहासिक स्थापत्याला अजरामर करण्याचे काम व्हिक्टर ह्यूगोने केले.

व्हिक्टर ह्यूगो म्हणतो –

"There exists in this era, for thoughts written in stone, a privilege absolutely comparable to our current freedom of the press. It is the Freedom of architechure." (Chapter II)

नॉत्र दामच्या स्थापत्यात व रचनेत नवनवे बदल होताना त्या वास्तूचा आत्मा कुठेतरी हरवत जातोय. डागडुजी करताना नवीन गोष्टी करताना नॉत्र दामचे सौंदर्य वाढण्याऐवजी भेसूर होत आहे असे वाक्य ह्यूगोने या कादंबरीतील पात्राच्या तोंडी घातले आहे.


या कादंबरीच्या माध्यमातून व्हिक्टर ह्यूगोने 'Epic Theatre' या प्रकाराच्या कादंबरी लेखनास सुरुवात केली.

"Notre Dame de Paris was the first work of fiction to encompass the whole of life, from the king of France to Paris sewer rats, in a manner later co-opted by Honore de Balzac, Gustav Flaubert and many their, including charles Dickens. The Enormous popularity of the book in France spurred the nascent historical preservation movement in that country and strangly encourgaged Gothicr revival architecture." - (Wikipedia)

व्हिक्टर ह्यूगोच्या The Hunchback of Notre Dame या कादंबरीत अनेक पात्रं असले तरी 'नॉत्र दाम' चर्च हे एक अनोखे पात्र म्हणून येत राहते. या वास्तुच्या परिघात घडत राहणाऱ्या या कथानकात नॉत्र दाम एक अत्यंत महत्त्वाचे जिवंत पात्र होऊन जाते.

या कादंबरीच्या प्रसिद्धी व लोकप्रियतेमुळे १९ व्या शतकात युजीन व्हिओले ल ड्यू (Eugene Viollet de Due) या स्थापत्यकाराने नॉत्र दामला ओक वृक्षाच्या लाकडापासून बनवलेला छत व कळस (Spire) बांधला. १५ एप्रिलला लागलेल्या आगीत हाच लाकडी भाग, मनोरा जळून खाक झाला. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धातील धामधुमीत तावूनसुलाखून निघालेली ही वास्तू फ्रेंचांच्या जवळ जवळ एक हजार वर्षांच्या इतिहासाचा मुक साक्षीदार असलेला वास्तुपुरुष आहे.

'नॉत्र दाम' मध्ये ख्रिश्चन धर्मात अति पवित्र मानलेल्या काही ऐतिहासिक वस्तूदेखील आहेत. त्यातली महत्त्वाची म्हणजे जो काटेरी मुकुट घालून येशू ख्रिस्ताला सुळावर चढवण्यात आलं तो काटेरी मुकुट (Crown of Thorns), संत लुईसचा सैल पोलका (The tunic of ST. Louis), तसेच येशूच्या १२ अंतरंगशिष्यांचे ब्राँझचे पुतळे. या वास्तुवरील खिडक्या या गुलाबाच्या लाल फुलांनी काचावर सुंदर कोरलेल्या असून १२ व्या शतकातील आहेत.



**Last Judgement**

अखेर आपली मते ही आपल्या भावनांवर अवलंबून असतात, बुद्धीवर नव्हे! – एच. स्पेन्सर

या चर्चवर कोरलेल्या अनेक मूर्ती या 'गोथिक' प्रकारात मोडणाऱ्या असून नितांत सुंदर आहेत. तत्कालिन अशिक्षित समाजाला बायबलमधील गोष्टी मूर्ती व स्थापत्य कलेच्या माध्यमातून समजावण्यासाठी नॉत्र दामच्या भिंतीवर विशाल शिल्प कोरली आहेत. याला 'Poor People's book' असे म्हणतात. यामध्ये Last Judgement चे सुंदर शिल्प आहे. विश्वाच्या शेवटच्या दिवशी परमेश्वर सर्वांच्या पापपुण्याचा फैसला करतो व चांगल्या व्यक्तीला स्वर्ग व वाईट व्यक्तीला नरक मिळतो ही संकल्पना त्यात चितारली आहे. त्यातील दुसरे शिल्प हे ॲडम व इव्ह यांना इडन गार्डनमध्ये सैतानाने सफरचंदाचे फळ खायला भाग पाडल्या संदर्भात आहे. याच विषयावर नंतर इंग्रजी कवी मिल्टनने The Paradise Lost हे महाकाव्य लिहिले.



**ॲडम व इव्ह**

या अभूतपूर्व वास्तूच्या वारशाला १५ एप्रिल २०१९ रोजी आग लागल्यानंतर काही तासांत ७२८ दशलक्ष डॉलरची मदत जाहीर झाली. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष यांनी लवकरच नॉत्र दामचे पुनरुज्जीवन करण्याची घोषणा केली आहे. बर्नार्ड अर्नालट यांनी २२६ दशलक्ष डॉलर, बेटनकोर्ट मेयर्स कुटुंबाने २२६ दशलक्ष डॉलर्स, फ्राँकुआझ पिनाट यांनी ११३ दशलक्ष डॉलर्स व पेट्रिक फुग्याने यांनी ११३ दशलक्ष डॉलर्स इतकी मदत जाहीर केली.

अल जझीरा या वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार नुकत्याच झालेल्या श्रीलंकेतील चर्चवरील साखळी बाँबस्फोटांच्या तुलनेत नॉत्रदामवरील आगीच्या बातमीला गुगलवर अधिक प्रमाणावर वाचले जाते आहे. २२ एप्रिल २०१९ रोजी अल जझीरा लिहिते –

'Google Searches for Notre Dame outnumbered Sri Lanka attacks 7:1'

फ्रान्सच्या नॉत्र दाम येथील आगीमुळे संपूर्ण युरोपात व ख्रिश्चन व्यक्तीच्या मनात चलबिचल झाली. हा जसा ऐतिहासिक वारसा आहे, तसा धर्मश्रद्ध मनाचा हुंकार देखील आहे. वैचारिक, राजकीय व सांस्कृतिक संघर्ष मागे सारून नॉत्र दामसाठी एकत्र येणाऱ्या मदतीच्या हातांकडे पाहून कुठल्याही राष्ट्राला अभिमान वाटावा.

भारतासारखा ऐतिहासिक वारसा थोड्या पाश्चिमात्य राष्ट्रांकडे आहे. हजारो वर्षांपूर्वीपासूनच्या लेण्या, मंदिरे, स्तूप, गड, किल्ले इत्यादी वास्तू आजही धूळ खात पडून आहेत. पुतळ्यांच्या राजकारणात व त्यावर होणाऱ्या वारेमाप खर्चापेक्षा ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनासाठी एकूणच भारतीय राजकीय व सांस्कृतिक मानस जागे होईल तो सुदिन म्हणावा लागेल. भारताला गरज आहे ती आधुनिक व्हिक्टर ह्यूगोची...

**– डॉ. प्रशांत पु. धर्माधिकारी**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.